वर्षांचो आगाऊ रु० ५ डांकहशील ०१३
साहामाही " ३ " ०८
साल अखेर " ७ " १०१८
किरकोळ अंकास ....................०४

Rs.
Per annum in advance 5 Postages 13
Per annum in arrears 7 ,, 1R. 8 as
Six monthly ............ 3 ,, 8 as
Single copy ............................ 4 as

नोटिशीबद्दल.
१० ओळींचे आंत रु. १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस.........०१

Advertisements.
Below 10 lines...
Per line over 10...4a
Repetition per line 3a

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL. XXI. AKOLA MONDAY 7 NOVEMBER 1887. NO 43.
वर्ष २१ अकोला सोमवार तारीख ७ माहे नोवेंबर सन १८८७ इ० अंक ४३.

## जाहिरात.

वऱ्हाड वक्तृत्वोत्तेजक सभेचा पंधरावा समारंभ सन १८८७ इसवी.

सर्वांस विनयपूर्वक कळविण्यांत येतें कीं, शहर उमरावती, येथें या सभेचा चालूं सालचा समारंभ ता० २३ माहे डिसेंबर रोज शुक्रवारपासून सुरू होणार आहे. समारंभाची जागा या पुढें कळविली जाईल.

चालू सालीं भाषणकरितां तीन विषय नेमिले आहेत ते असेः—

विषय १ ला—जुनें असो कीं नवें असो, जें उपयुक्त व न्याय्य तें सर्व चांगलें व ग्राह्य आणि जें अनुपयुक्त व अन्याय्य तें सर्व वाईट व त्याज्य हा सिद्धांत पाश्चिमात्य लोकांचे मनांत बहुत वर्षांपासून बिंबल्यामुळें त्यांचा एकसारखा उत्कर्ष होत गेला व तो सिद्धांत आपल्या लोकांच्या मनांत तसा पूर्णपणें न बिंबल्यामुळें आपणास उत्तरोत्तर निकृष्टस्थिति येतचालली आहे या विषयावर उपपत्तीसह ऐतिहासिक प्रसिद्ध दृष्टांत घेऊन भाषण करणें.

विषय—२रा हिंदुस्थानांत जातीभेद उत्पन्न होण्याचीं सयुक्तिक कारणें कोणतीं असावित, या जातीव्यवस्थेपासून लोकांचे हिताहित कोणतें झालें आहे, हा जातीभेद आमच्या हल्लींच्या स्थितिमुळें कसा बदलत चालला आहे, त्याचे बरेंवाईट परिणाम कोणते होत आहेत व त्यापासून जितकें अधिक हित होईल तितकें साधण्यास त्याला कोणतें स्वरूप आलें पाहिजे.

विषय ३ रा—हिंदुलोकांच्या हल्लींच्या सामाजिक स्थितीमध्यें मुलाच्या किंवा मुलीच्या विवाहाची घटवटना चालूं झाल्यापासून सर्व लग्नसोहळा संपेपर्यंत फाजील खर्चाच्या व इतर अव्यवस्थित चालीच्या संबंधानें सांप्रत कसें नुकसान व गैरसोयी सोसाव्या लागत आहेत त्यांचें समग्र निरूपण करावें व त्यांच्या निवारणार्थ साध्य उपाय सुचवावें.

बक्षिसें—पहिल्या विषयाला एक बक्षीस रुपये ३० चें ठेविलें आहे; परंतु या विषयावर भाषण करणाऱ्या उमेदवारांचें भाषण परीक्षकांस फारच चांगलें वाटल्यास सदरहु बक्षिसची रकम ४० रुपये पर्यंत वाढविली जाईल.

दुसऱ्या विषयाला एकच बक्षीस रुपये २५ चें ठेविलें आहे.

तिसऱ्या विषयास पहिलें बक्षीस रुपये२० चें व दुसरें रुपये १० चें. अशीं दोन बक्षिसें ठेविलीं आहेत.

उमेदवारांस लागूं असणारे नियम.

(१)उमदवाराचें वय १८ वर्षां पेक्षां कमी नसावें.

(२) उमेदवारोंन उभे राहून भाषण करावें व जवळ लेखी टिपण बोलते वेळीं ठेवूं नये.

(३) प्रत्येक उमेदवारानें अर्ध्या तासावर भाषण करूंनये. परंतु योग्य वाटल्यास अर्ध्या तासापूर्वीच भाषण बंद करण्याचा किंवा एक तासपर्यंत मुदत अधिक वाढविण्याचा अधिकार परीक्षकांस आहे.

(४) कोणी कोणाही व्यक्तीस अनुलक्षून लावून भाषण करील किंवा सरकारच्या विरुद्ध भाषण करील किंवा बभित्स शब्द भाषणांत आणील तर त्याचें भाषण बंद करण्यात येईल.

(५) भाषणाच्या पूर्ण गुणांच्या एक तृतीयांश हून अधिक गुण ज्या उमेदवारांस मिळाले आहेत त्यापैकीं ज्यांचीं भाषणें परीक्षकांस पसंत पडतील त्यांसच बक्षिसें दिलीं जातील.

( ६ ) ज्या उमेदवारांस सभेकडून बक्षिसें देण्याचें ठरलें त्यांनीं आपल्या भाषणाचा लेखी सारांश सभेच्या सेक्रेटरींजवळ आणून दिल्याशिवाय त्यांना बक्षिसें दिलीं जाणार नाहींत.

(७)ज्या उमेदवारांस या सभेकडून तीन बक्षिसें मिळालीं असतील त्यांस पुनःबक्षीस मिळणार नाहीं.

( ८ ) नेमलेल्या तीन विषयां पैकीं कोणत्याही एकाच विषयावर भाषण करण्यास उमेदवारांस परवानगी आहे.

(९)परीक्षेस येणाऱ्या उमेदवारांनीं आपले अर्ज ता० २० डिसेंबरच्या आंत सेक्रेटरींकडे पाठवावे व समारंभाच्या पूर्व दिवशीं त्यांस भेटावें.

नेमलेल्या अगर दुसऱ्या एखाद्या स्वतंत्र विषयावर सन्मानार्थ भाषण करण्याची कोणाची इच्छा असल्यास त्यांस सवडी प्रमाणें परवानगी देतां येईल.

ह्या सभेच्या समारंभाच्या वेळीं श्रोत्यांचा समारंभाच्या ठिकाणीं बसण्याची योग्य व्यवस्था व्हावी या साठीं सालाबाद प्रमाणें यंदां ही पास व टिकिटें काढण्याचें ठरलें आहे.

या सभेचे वर्गणीदार सभासद व व्यवस्थापक सभासद यांस टिकिटें घ्यावी लागणार नाहींत त्यांस पास देण्यांत येतील. विशेषः—दोन रुपये किंवा दोन रुपयांहून अधिक वर्गणी देणाऱ्या वर्गणीदारांस त्यांचा स्वतःचा पास देऊन त्या शिवाय दोन आण्याचा एक "फ्री" पास दिला जाईल.

वर्गणीदारांशिवाय इतर गृहस्थांकरितां दोन प्रतींचीं टिकिटें काढलीं आहेत.

प्रत पहिली-- (४) चार आणें
प्रत दुसरी- (२) दोन आणें

या शिवाय शाळेंत जाणाऱ्या विद्यार्थ्यांकरितां (१ आण्याचीं तिकिटें काढलीं आहेत.

चार आण्याहून जास्ती किमतीचीं ही टिकिटें मिळतील.

टिकिटें समारंभाच्या पूर्वीं सभेच्या सेक्रेटरींकडे मिळतील आणि समारंभाच्या वेळीं त्या ठिकाणीं मिळतील.

पास किंवा टिकिटें एकदां घेतलीं म्हणजे ती चालू सालच्या समारंभाच्या सर्व रात्रीं उपयोगीं पडतील. प्रत्येक रात्रीं नवीन पास किंवा टिकिटें घेण्याचें कारण नाहीं. परंतु पास अगर. टिकिटें प्रत्येक रात्रीं सभागृहाच्या दरवाज्यावर दाखविलीं पाहिजेत. त्या खेरीज आंत जाण्याला परवानगी नाहीं.

कुलीन स्त्रियांना बसण्याकरितां पडदपोशीच्या जागेची व्यवस्था केली आहे.

ज्या उमेदवारांचे कोणत्याही विषयावर बक्षिसाकरितां बोलण्याचे लेखी अर्ज आले असतील किंवा ज्या गृहस्थांच्या सन्मानार्थ बोलावयाचें असेल त्यांस टिकिटे घेण्याची गरज नाहीं. सेक्रेटरींकडून त्यांस पास दिले जातील.

या शिवाय सेक्रेटरींस किंवा त्या कामीं योजलेल्या व्यवस्थापकांस वाटल्यास कोण त्याही गृहस्थास "फ्री" (फुकट) पास देण्याचा त्यांना अधिकार आहे.

| | |
|---|---|
| उमरावती ता.१८ माहे आक्टोबर सन १८८७ इसवी. | नारायण गोविंद केतकर<br>सखाराम चिमणाजी गोळे<br>वऱ्हाड वक्तृत्वोत्तेजक सभेचे सेक्रेटरी |

## सन १८८७ इ० सालच्या शिक्षक समाजांत होणाऱ्या कामाचें पत्रक.

(PROGRAMME.)

बुधवार, तारीख ९ माहे नोवेंबर सन १८८७ इ०

( सकाळचे १० पासून ११ वाजेपर्यंत )

१ मे० डैरेक्टर साहेब यांचेकडून समाजाची सुरवात.

२ सेक्रेटरी यांनीं तयार केलेला गेल्या सालचा रिपोर्ट वाचून पसंत करणें.

३ शिक्षक समाजाचे फंडांतून आजपर्यंत घेतलेली पुस्तकें सर्व वर्गणीदारांकडे वाचनाकरितां पाठवितां येतनाहींत असें मागलि अनुभवावरून कळून आलें आहे सबब जागोजाग जमणाऱ्या पोटशिक्षक समाजाचा स्वतंत्र पुस्तकसंग्रह असावा;व पुस्तकें विकत घेण्यास खर्च त्या त्या पोटशिक्षक समाजाचे वर्गणीच्या रकमेंतून होऊन तिचा कांहीं अंश मुख्य शिक्षकसमाजाचे वार्षिक खर्चाकरितां मिळावा या सूचनेचा विचार करणें.

( दुपारचे २ वाजल्यापासून ४ वाजे तो पर्यंत)

१ राजश्री गोविंद नारायण चिकाटी हेडमास्तर अ. व्ह. स्कूल बाळापूर हे "आमचे शाळांतील नीति शिक्षण" या विषयावर निबंध वाचतील.

२राजश्री हरी गोविंद सिधये हेडमास्तर-व्ह० स्कूल गांजरखेड हे चवथ्या इयत्तेंतील मुलांस कविता शिकवून दाखवितील,

३ राजश्री चिमणाजी माधव अ. मास्तर अ. व्ह०स्कूल मुर्तिजापूर हे सहाव्या इयत्तेंतलि मुलांस क्रमिक पांचवे पुस्तकांतील शास्त्रीय विषयावरील एखादा धडा शिकवून दाखवितील.

गुरुवार ता. १० माहे नवंबर १८८७

( सकाळचे ११ पासून १ पर्यंत )

१ पुढील सालच्या जमाखर्चाचें अंदाजपत्रक पसार करणें.

२ राजश्री त्रिंबक माधव भिडे थर्ड अ. मास्तर अं. व्ह. स्कूल यवतमाळ हे "मोडीलेखन" यां विषयावर निबंध वाचतील.

३ उत्तम मोडी अक्षर लिहिणाऱ्या विद्यार्थ्यांस समाजाचें फंडांतून बक्षिसें देण्यांत यावीं" अशी सूचना सेक्रेटरी यांजकडे आली आहे तिचा विचार करणें.

( दुपारचे २ पासून ४ पर्यंत)

१ राजश्री गोविंद जनार्दन हेडमास्तर व्ह. स्कूल कळंब हे चवथ्या इयत्तेंतील मुलांस इतिहास शिकवून दाखवितील.

२ राजश्री दामोदर कृष्ण टिळक हेडमास्तर अं. व्ह. स्कूल मुर्तिजापूर हे चवथ्या इयत्तेंतील मुलांस मराठी व्याकरण हा विषय शिकवून दाखवितील.

३ मिरतर अब्बासखान हेडमास्तर हिंदुस्थानीं स्कूल मलकापूर हे पांचवे इयत्तेंतील मुलांस उर्दू कविता शिकवून दाखवितील.

शुक्रवार ता. ११ माहे नवंबर १८८७

( सकाळचे ११ पासून १ पर्यंत )

१ सहाव्या इयत्तेंतील विद्यार्थ्यांस हल्लीं हावर्डकृत इंग्रजी तिसरें पुस्तक शिकवितात त्याचे ऐवजीं रायलरीडर्स नंबर ३ हे पुस्तक चालूं करावें असा पुष्कळ व्यवस्थापक सभासदांचा अभिप्राय आला आहे त्याचा विचार करणें.

२राजश्री श्रीधर रामचंद्र पिंपळखरे हेडमास्तर अं. व्ह. स्कूल उमरावती, हे "मराठी भाषेस उत्तेजन येण्याकरितां शिक्षक लोकांनीं कोणकोणते यत्न केलेपाहिजेत? या विषयावर व्याख्यान देतील किंवा निबंध वाचतील.

३ रात्रीचे वर्ग गांवठी शाळांस उत्तेजन व स्त्रीशिक्षण या गोष्टींच्या संबंधानें गेल्या सालांत शिक्षकांनीं जी खटपट केली तिचें निरूपण व त्या विषयीं विशेष विचार करणें.

( दुपारचे २ पासून ४ पर्यंत )

१ राजश्री उद्धव व्यंकटेश बंवे अ. मास्तर अं. व्ह स्कूल उमरावती हे सहावे इयत्तेतील मुलांस भाषांतरपाठमालेचा एखादा धडा शिकवून दाखवितील.

२ राजश्री बळवंत माधव हेडमास्तर म्यु. स्कूल नंबर १ उमरावती हे चवथ्या इयत्तेंतील मुलांस क्रमिक चवथ्या पुस्तकांतील एखादा धडा शिकवून दाखवितील.

३ राजश्री भास्कर रघुनाथ कुंटे फ. अ. मास्तर म्यु. स्कूल नंबर १ उमरावती हे सि-

सऱ्या इयत्तेतील मुलांस गुणाकार शिकवून दाखविणें.

शनिवार ता० १२ नवंबर सन १८८७इ.

( सकाळीं ७ पासून ९ पर्यंत. )

तालीम मास्तरांचा उपयोग फार थोडक्या शाळांस होतो यास्तव ज्या शाळांस तालीम मास्तराची फारशी मदत मिळत नाहीं त्या ठिकाणीं आपले चेंडू, दांडू, खो खो, आव्या पाव्या, हे खेळ मुलांकडून खेळविण्याची आवश्यतता किती आहे याचा विचार करणें.

२ आयत्यावेळी एखाद्या महत्वाच्या विषयासंबंधीं सूचना झाल्यास तिचा विचार करणें,

३ शिक्षकसमाजाचे अध्यक्षाकडून सभाजाचें विर्सजन.

( दुपारीं ४ पासून काम संपेपर्यंत. )

१ शिक्षकसमाजाचे सेक्रेटरी व इन्स्पेक्टर मंडळाचे सेक्रेटरी हे समाजांत झालेल्या कामांचे रिपोर्ट वाचतील.

२ मे. डायरेक्टर साहेबांचें संभाषण होऊन समाजाचें विसर्जन होईल.

Shridhar R. pimpalkhary

Amraoti 5th Actober 1887 } Janardan Narayn Natu

Secretaries, Teacher, Association.

नोटीस.

नमुना ( जी. )

पंजाब नादारी मुकद्दमा नंबर १९.

सन १८८७ इ०

विद्यमान नादारी कोर्टीचे जज्ज साहेब जिल्हा आकोलें.

सर्वत्रांस कळविण्यासाठीं प्रसिद्ध केलें जातें कीं सदाशीव बल्वद नीळकंठ देशपांडे रहाणार पंचगव्हाण तालुके आकोट हा नादार आहे असा आज तारखेस ठराव झाला आहे आणि तारीख १२ माहे नोवेंबर सन १८८७ इ० हा दिवस नादाराच्या सावकारांनीं जमण्या करितां आणि सावकारांनीं आपल्या तर्फे असामी नेमून देण्या करितां व नादारानें आपल्या सुटकेविषयीं दिलेल्या अर्जाचा विचार करण्याकरितां नेमिला आहे.

नादाराच्या सुटकेसंबंधीं ज्या सावकारांची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं याबद्दल आठ आण्याचे स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटीशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल, आणि त्याबद्दल साक्षी समन्सें करावयाची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें दाखल करावीं. ही नोटीस नेमण्याकरितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस पूर्वी तरी दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं नोंदण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड रीतीनें ठेविल्या आहेत. ज्या नांवावर दावे नोंदविणें असतील त्यांनीं ०८ आठ आण्याचे स्टांप कागदावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी. व ते दावे खरे असले बद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्यावर अर्जदारानें सही केली असावी.

जे सावकार दूरचे रहाणारे असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशिअल आफिसरापुढे तिच्या खरेपणाविषयीं शपथ लिहावी आणि ती यादी टपालांतून कोर्टास पाठवावी म्हणजे ते दावे रजिष्टर दाखल होतील. कळावें तारीख १ माहे नोवेंबर सन १८८७ इ०.

Moulvi Nizamuddin.

जज्ज.

वऱ्हाडसमाचार.

मिती कार्तिक वद्य ६ शके १८०९

## हिंदुस्थानदेश खरोखर गरीब स्थितींत येत चालला आहे काय?

(अंक ३४ वरून पुढें चालूं.)

देशांतील लोकांची स्थिति चांगली होत चालली आहे किंवा नाहीं या बद्दल विचार करणें तो दोन तऱ्हेनें विचार केला पाहिजे. म्हणजे एकंदर देशांतील द्रव्याची समृद्धि होत असेल परंतु तिचा उपभोग थोडक्या लोकांना घेतां येत असेल. व कदाचित् असें ही होत असेल कीं ज्या मानानें द्रव्य समृद्धि देशांत होत असेल त्याच मानानें द्रव्याचा उपभोग थोडक्या लोकांसच न सांपडून सर्व प्रकारच्या लोकांस सांपडत असेल. हल्लीं या देशांत द्रव्य पुष्कळ उत्पन्न होत आहे कीं काय व त्या द्रव्याची लोकांत कोणत्या प्रकारानें वांटणी होत आहे हें पाहिले पाहिजे. आतां ' द्रव्य ' या शब्दाचा अर्थ काय आहे? द्रव्य म्हणजे रोकड पैसा कीं काय? थोड्या विचारा अंतीं असें कळून येईल कीं द्रव्य हें उपभोगाचें एक साधन आहे. व्यवहारांत हरएक उपभोगाची वस्तु पैशानें मिळते; परंतु केवळ पैसा हातांत बाळगून ठेविल्यानें उपभोगाच्या वस्तु मिळतात असें नाहीं. त्या मानानें ' द्रव्य ' या शब्दाचा अर्थ बराच व्यापक आहे असें मानले पाहिजे. ज्या ज्या गोष्टींचा व्यवहारांत आपणांस उपभोग होतो त्या सर्व द्रव्यांत गणिल्या जातील. ह्या देशांतील लोकांचें उत्पन्न जमिनी पासून होणारें वाढलें आहे हें पुष्कळ लोक कबूल करतील; जमिनीचें उत्पन्न पडित जमिनीची लागवड झाल्यामुळें अधिक झालें आहे. ही गोष्ट बहुतेक निर्विवादच आहे. उत्पन्नाची बाब म्हटली म्हणजे काय ती जमीन. व्यवहारांस लागणारे बहुतेक सर्व जिन्नस जमिनी पासून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें उत्पन्न होतात, म्हणूनच ज्या प्रमाणानें जमिनापासून होणारें उत्पन्न जास्त वाढत जाईल त्या प्रमाणानें देशांतील ' द्रव्य ' किंवा उपभोगाच्या वस्तु, व त्या मिळविण्याचीं साधनें वाढत चालली आहेत असें मानण्यास हरकत नाहीं. आतां देशांतील जमिनीचें उत्पन्न जास्ती होत चालले आहे यांतून एकंदरीचें मानानें दुसऱ्या लोकांना यांतील किती भाग मिळतो व त्या मुळें या उत्पन्नांत किती वजावाट केली पाहिजे हें पाहिलें पाहिजे. पहिलें कलम वजा करण्याचें म्हटलें म्हणजे जे युरोपियन् लोक या देशांत मोठमोठ्या पगाराचे जागेवर नोकऱ्या करितात ह्यांचें ओझ्याचें ओझें पगार हें होय. जितकें द्रव्य या लोकांत वर्षाचेवर्षी द्यावें लागतें तितकें द्रव्य या देशांतील लोकांस भोगण्यास रहात नाहीं हें उघड आहे. त्याचा उपभोग दुसऱ्यांस होतो. जेवढें द्रव्य त्यांस जाते तेवढ्यापूर्ती उपभोगाची वस्तु मिळविण्याची शक्ति जास्त होते. व तितकीच आमच्या देशाची कमी होते हें उघड आहे. हे पगार जाऊन जी बचत राहील त्यांतून दुसरा एक मोठा जबरदस्त खर्च आहे. जो माल हल्लीं विलायतेंतून इतर युरोपांतील देशांतून किंवा अमेरिकेंतून येतो त्या मालाचें मोल आपणांस फार भारी पडतें. तोच माल या देशांत उत्पन्न होऊं लागल्यास स्वस्त पडेल यांत संशय नाहीं. तिकडून येणारे मालाची किंमत बहुतेक तेथील लोकांचे कर्तबगारीची असते. त्यांत ऐन माल थोडा व मेहेनत जास्ती; त्या मुळें त्यांस कामाची जी किंमत मिळते तिचा बराच मोठा भाग त्यांचे मेहेनतीचा मोबदला होय. हीच मेहेनत या देशांतले देशांत झाल्यास जितके कामगार तिकडे पोट भरतात तितके कामगार इकडेच पोट भरतील व तितकें द्रव्य मिळविण्याचें साधन या देशांत राहिल्यासारखें होईल. हीं दोन्ही कलमें काढून टाकलीं म्हणजे बाकी निवळ उत्पन्न राहील तें या देशांतील लोकांमध्यें वांटणी होण्यास शिलक राहील. आतां हें उत्पन्न लोकांस वांटलें जाण्याचीं कारणें अनेक तऱ्हेचीं आहेत हल्लींचें मानानें पाहिलें असतां जमिनीपासून जें उत्पन्न होतें तें थोडक्या लोकांचे हातीं पडतें. उत्पन्न करणारे शेतकरी लोक असून उत्पन्न या सावकार लोकांचे हातीं कर्जदारींत जातें व अर्थातच जे लोक उत्पन्न करितात त्यांचे स्वतःचे उपभोगासाठीं उत्पन्नाचे मानानें फारच थोडें राहतें.

यामुळेंच इतकें उत्पन्न जमिनींतून दर साल निघून शेतकरी लोकांची स्थिति ज्या प्रकारची दिसावी तशी दिसत नाहीं. वऱ्हाडांतलीच स्थिति पाहिली तर दरसाल रजिष्टर झालेले दस्तऐवजांची संख्या वाढत चालली आहे म्हणजे दरसाल कुळांच्या जमिनी सावकार लोकांचे घरांत जात आहेत. या प्रमाणेंच कांहीं दिवस स्थिति राहिली तर कदाचित् कांहीं दिवसांनीं कुळांच्या जमिनी बहुतकरून सर्व सावकार लोकांचे घरांत जातील आतां या एकंदर कारणा पैकीं किती कारणांची जबाबदारी इंग्रज सरकारचे माथीं येतें हें पाहिलें पाहिजे देशांतील संपत्ति कमी होण्याचीं कारणें किंवा निदान कमी झालीशी वाटण्याचीं कारणें तूर्त वर सांगितले प्रमाणें आहेत त्यांचें एके ठिकाणीं निदर्शन करूं. पहिलें हिंदुस्थानांत पर द्विपस्थ लोक मोठाल्या अधिकारावर असून मोठमोठे पगार खातात; दुसरें इतर देशांतून जो माल इकडे येतो त्याचे मेहेनत मजुरी बद्दल तिकडील लोकांस मोबदला जातो; तिसरें संपत्तीचा विभाग होणें तो सर्व लोकांत ज्यां प्रमाणें व्हावा तसा न होतां मलाई एकाचे हातीं व निवळ दुध दुसऱ्याचे हातीं असें होतें. या कारणा खेरीजही आणखी एक कारण असें आहे कीं दिवसानुदिवस लोकसंख्या वाढत चालली आहे जिकडे तिकडे स्वस्थता असल्यामुळें मरणाची संख्या कमी व उत्पन्नाची संख्या जास्ती अशी स्थिति आहे. मागील खानेसुमारीचे वेळची लोकसंख्या व हलीचे खानेसुमारीची लोकसंख्या पाहिल्या असतां लोकसंख्या बरीच झपाट्यानें वाढत चालली आहे असें स्पष्ट दिसून येईल. आतां जरी उत्पन्न पहिल्या पेक्षां हल्लीं जास्त वाढलें आहे तरी जर त्या उत्पन्नाचा खर्च करणार किंवा त्या उत्पन्नातील भागीदार जर जास्ती वाढले तर अर्थात् उत्पन्न वाढूनही मोठासा फायदा नाहीं. आतां उत्पन्न ज्या प्रमाणानें वाढलें आहे त्या प्रमाणानें लोकसंख्या वाढली आहे किंवा नाहीं याचा बराबर विचार करणें असल्यास इंग्रजी अंमल येण्या पूर्वी लोक संख्या काय होती व उत्पन्न काय होतें याज बद्दल प्रमाण खात्रीलायक मिळालें पाहिजे. जर तसें प्रमाण मिळणार नाहीं तर त्या वेळचे उत्पन्नापेक्षां हल्लींचें उत्पन्न कितीपट वाढलें आहे व लोकसंख्या कितीपट वाढली आहे याचा थांग लागणार नाहीं. निदान वऱ्हाडा सारख्या एका प्रांताचा तर या प्रमाणें हिशेब पाहिला पाहिजे. आमच्या पाशीं तूर्त तरी निदान या दोहीं गोष्टींचें प्रमाणें नाहींत व जों पर्यंत हीं प्रमाणें नाहींत तों पर्यंत या विषयीं निर्णयात्मक कोणची ही गोष्ट सांगता येणार नाहीं. आतां लोकसंख्या वाढत चालली आहे याजबद्दल तरी निदान इंग्रज सरकार जबाबदार नाहीं हें कबूल करावें लागेल. या देशांतील लोक मुलांचे संरक्षणाची ऐपत आपणांस आहे किंवा नाहीं याचा मुळींच विचार न करितां लग्नें करतात व पुढें जी प्रजा उत्पन्न होते ती सर्व एकंदर होणाऱ्या उत्पन्नाचे भागीदार होतात. लोक योग्य विचार न करितां जर दिवसानुदिवस संतति वाढवीत गेले तर यास इंग्रज सरकार काय करणार? याचा विचार ज्यांचा त्यांनींच केला पाहिजे. आतां इंग्रज सरकारचे राज्यामुळें या देशाची स्थिति गरीब होत चालली आहे किंवा नाहीं याचा विचार करतांना लोकसंख्या वाढत आहे व त्याजबद्दल इंग्रज सरकार जबाबदार नाहीं ही गोष्ट नेहमीं लक्षांत ठेविली पाहिजे. आतां दुसऱ्या कारणांचा विचार करूं लागलें असतां ही गोष्ट निर्विवाद आहे कीं गोरे अंमलदार पुष्कळ पैसा दरसाल या देशांतून ओढतात व या मुळें या देशाची तितकी संपत्ति कमी होते. अर्थात इंग्रज लोकांचे राज्य या देशावर नसतें तर हा पैसा या देशांतच राहता दुसरें या देशांत बाहेरून जो माल येतो तो माल येण्याचें कारण येथील लोकांस तसा माल करतां येत नाहीं; म्हणजे जशी यंत्रांची वगैरे सोय तिकडे असून त्यांचे साह्यानें माल भराभर तयार होतो तसा इकडे होण्याचा योग नसल्यामुळें तिकडचा माल इकडे येतो. इकडील लोकांचे हातीं तितकी कर्तबगारी नसल्यामुळें म्हणा किंवा त्यांचे अज्ञाना मुळें म्हणा यांत्रिक कलाचा या देशांत जितका प्रसार झाला पाहिजे तितका झाला नाहीं; व ही गोष्ट लोकांचे मुर्खपणाचाच परिणाम आहे असें म्हटलें पाहिजे. या संबंधानें इंग्रज सरकारावर जबाबदारी आहे

माही " २
अखेर " ७
ळ अंकास .........
नोटिशीबद्दल.
ओळीचे आंत रु. १
दर ओळीस ०१०६
खेपेस ........ ०१
L. XXI.
२१
NO 44.
अंक ४४.
... 8 as.
......... 4 as.
vertisements.
10 lines...
ne over 10...4a
ition per line 3as

नोटीस.

रा० रा० यशवंतराव ... मौजे स्वस्ती ता ... सही करणार ... येते कीं, तुमच ... १२९४।९५।९६ ... न जावा ह्मणून ... दिल्या असून त्या ... न करितां विनाक ... नोटीस दिली ... लोपार्जित खर्च ... खर्च देणें रास्त ... आलां सांप्रत ... नाहीं ह्मणजे ... गैर आहे ... १० सप्टेंबर १८

नोटीस. ... रामराव ... प्रगणे ... सभा ... देण्यांत येते ... धर्मादाव ... २०० घेत ... नाहीं ... देणें ... रात्रा ...

तां येणार नाहीं. तिसरें सं... र्णे तो सर्व लोकांत सारख... लोकांत होतो. हा ही परि... खिंपणा मुळेंच होत आहे. राज्यामुळेंच हा परिणाम ... सर्व देशांत अकलवाले ... कांवर आपलें वर्चस्व ठेवून ... करून घ्यावा असें चाललें ...

मनुष्याचे घरांत पडावा हा ... गांचा परिणाम आहे. कोण... च स्थिति आहे. म्हणून या ... डी वगैरे हुषार लोकांचे हातीं ... वा सर्व किंवा बहुतेक नका ... नवीन नाहीं. आतां हल्लीं ... कायदे कानुच्या मानानें ... लोक बुडत असतील परंतु ... यांचा मुळचा उद्देश लोकांना ... ाहीं. लोकांस ज्ञान नसल्यामुळें ... तां या दोनही कारणांचें बीज ... ां लोकांचें अज्ञान हें होय. ... वाढण्याचें हीं कारण तेंच ... ांचें निर्मूलन करण्या करितां ... कच आहे. तो हाचकीं लोक ... पाहिजेत. लोकांचें आंगीं ... जास्त हुषारी आली पाहिजे. ... क कलेची माहिती झाली पा... लवकर केल्यानें आपणास ... स व आपणास काय दुःखें ... गत याचा विचार करतां येण्या... त्यांस आली पाहिजे. हिंदुस्थान ... येत चालली आहे कीं काय ... करण्यास वर सांगितलेल्या ... विचार केला पाहिजे या प्रश्ना... गूढ आहे. एकपक्षीय विचार ... सिद्धांत आपणास समजणार ... देशाची स्थिति गरीबीची अ... त्यास वरील विद्या वृद्धिरूप ... गीतली आहे तेव्हांच कायतो ... आहे.

The Berar Samachar

MONDAY NOVEMBER 7, 1887

## DISCUSSION ABOUT MUNICIPAL RULES AT AKOLA.

The ... week that saw the races at Akola ... also saw a business-like meeting of the ... six Deputy Commissioners headed by the ... Commissioner. The Commissioner sug... gested the utility of discussing together ... certain rules to be framed by the Resid... der the New Municipal Act. The r... tion for doing something toward ... ually carrying out the new Law ... t is understood, from the Govern... of India; and the current has co... wn to the Deputy Commissioners. ... s no wonder that the Supreme Govr... nent should notice the lethargy and s... ch apparent neglect of the Local Self-G... overnment scheme shown in Berar. Th... Municipal Act was to come into force ... 1st January 1887; but although we ... now close upon the end of the year, ... there seems hardly any appreciable ... rogress made towards the actual electi... a business, and the constitution of ... new Committees under the Act. At the late gathering of the six responsible heads of the six districts the rules were discussed within the space of about two hours and a half. Of course, the Commissioner's object in discussing the rules, was only to see if some general principles could be laid down for the guidance of the several Committees; the discussion was meant to be only cursory and general, without entering into details. A couple of English knowing gentlemen from each Municipality were invited to attend presumably for being consulted. The Commissioner wished to have some general rules for all Municipalities, if possible; especially the rules about the qualifications of voters and candidates under the New Act. It was however not found feasible to have common rules for all Municipalities and the result was that certain qualifications of voters and candidates were suggested, leaving however a margin for each Municipality to extend or curtail the limits as suited it best. This was practically of very little value indeed. Our own idea of the thing was, that the qualifications of voters and candidates would have to be fixed without any reference to any common standard. The qualifications of voters and candidates should be so fixed as to allow a certain percentage only of the population within the limits of a Municipality to vote and stand as candidates. For instance if it be determined that 25 per cent of the whole population within a Municipality should have the right to vote then conditions would easily be attached in each different Municipality, so as to let in only 25 per cent as voters. This percentage should have been fixed by the meeting and then each municipality should have been left to frame their own conditions so as only to let in that percentage and no more. The rules suggested at the meeting as affording common ground for all, are to be re-submitted to the several committees and the margin that is left to the Committees should now be utilized by them as we have indicated above the same must be said of the number of municipal Commissioners. The number of municipal commissioners, it is not desirable, should be the same everywhere; and the safest way of securing an adequate number is to fix the number of Commissioners for every 100 voters or so.

It must be remembered that the Local Self Government scheme is only in its infancy; experiments have yet to be tried in connection with almost everything relating to the new Law. At such a juncture, the rules must be carefully framed. They should only let in a small number of voters and still smaller number of candidates. The privilege of election is, although not difficult to be comprehended when the people are once used to it, quite a novel one; and care will have to be taken to secure it primarily to such as can appreciate the boon; for the fact cannot be denied that the right to vote is not familiar to the Hindoo as is is to an Englishman. The qualifications for that privilege should therefore be neither too low nor too high; a happy medium will have to be found; and the various municipalities ought to take care that in each case a proper number only is let in. The Resident, cannot possibly know the various circumstances of the several municipalities; and he must depend, in a very great degree on the rules sent up to him. If the qualifications were pitched too high, the very object of the Local SelfGovernment scheme is likely to be defeated; if they are too low the privilege is likely to be abused. In either case, the result wold be to throw cold water on the whole scheme. It must not be forgotten, in framing the rules, that the practical success of the embryo committes must depend on rules based on local wants and aptitudes; and that the committees yet to be born are to be judged by their results which necessarily depend on the goodness of the rules now framed. The rules must therefore be few and simple; neither difficult in working nor impracticable on account of details. They are of course, liable to be recast, as emergencies arise; but the general tendency might safely be to let in only a few rather than too many; for people would thus be educated in obtaining a much valued franchise by a very health ymental exercise.

One thing was particularly noticeable at the meeting. The Deputy Commissioners who nodded their yeas and nays, were unanimously aud emphatically against the proposal of the Akola Municipality to give a distinct franchise to the educated classes, They were entirely against the idea of new fledged graduate boys airing their English at the meetings. One thing is quite clear, either the D.C s have very little appreciation of educated native graduates or the types that have yet been furnished to them of these men have not created any sensible impression on them. Whatever it is, the opposition was clear and the special franchise proposed to be given to educated classes in conformity with the practice in England and on the Continent, was rejected for our own part, we should think that there is no need at present of giving a special franchise to the educated classes here in Berar. They would always be represented and they may count upon them being often returned as members whatever the nature of the rules framed; and so long as they are represented, there seems no need of a special franchise, But we should certainly be the first to disavow the reason for which the Deputy Commissioners at the meeting thought fit to refuse a special franchise to the educated classes. This much must be said to the credit of our local municipality that it was the only one that suggested an educational franchise. But as it is, we believe, the proposal is rather a head of the times; and is more the out-come of zeal than substantial need.

---

The Berar educational conference comes off next week. It is to be held this year at Amraoti on the 9th of November and the three following days. The programme of subjects to be discussed at the coming conference has already appeared in the columns of our local contemporaries. In connection with the conference we should like to offer one important suggestion which we hope, will receive the due consideration of the president of Teachers' Association. Eminent educationalists like Lord Ready considering full well the course of studies prescribed for the low and high schools and colleges in the B. P. have come to the conclusion that the introduction of scientific subjects in the present educational curriculum is absolutely necessary to meet the rising demands of India. The Director of Public Instruction for Berars has recently revised the standards and introduced science as an optical subject. However there being no adequate provision of t... must remain ... come. So the ... is to assemble ... should conside... introduce scie... higher schools ... as possible.

The Akola ... mination has b... that appeared ... have come ... on the whole ... reflects credit ... that have brou...

... नीं एकमेकांचे व ... वहिवाट होती ... चालू आहे. प... णाऱ्या मंडळींनीं ... जची भेट बहुते... त्न चालविला आ ... यत्न सफल आहे.

हवामानः— ... साजपैकीं व्यक्ति ... न अगदीं बिघड ... णारे, रीतिभाती ... दित असतें ... ील तर आपणांस ... मोठमोठ्या सरहच. सामाजिक ... पाया आजा... ल्या प्रमाणानें स... चालला आहे पण ... रें वाईट असेल ... होण्याची भीति ... एका समाजांतील ... पुढील आठ ... आपणांस नित्य ... ला उमरावतीस ... व एकमेकांचे वि... मे. कर्नल ... दळणवळण वा... ठवड्यांत जिल्ह्या... जे. आतां जुन्या ... मे. सांडर्स ... गाठी पडून ह्मणा ... आठवड्यांत येथु ... क्लबांत जमून ह्म... मे. स्यानिटैर ... एकमेकांचे दळण ... नाळापुरास आहे ... उवड आहे. अर्थां ... मि. सी. ए... हे तर हल्लींचे क्लबा... येथें बदली झाल ... णीं वाढणें इष्ट आहे ... मि. एफ. रा... चें एकमेकांचे सं... लिस हे रजेवरू... कारचें असावें वगैरे ... न. आ. कंत्राट ... विचार करणार आहों. ... सु० हे आपले ... गांव लाहान असेल ... ई. जे. गंधार्प ... वळीं जमण्याची व्य... क्लास हे आपले ... पवस्था व्हावी असा ... डब्यु डी. मोफट ... नाहीं. ज्या टिकाणीं ... हे आपले फोर्थ ... जागें असेल म्हणजे ... ए. फ्रेजर, आ... जाणारे पुष्कळ लोक ... पर्श असि. सुप... जाणेंही दुरापास्त ... आहे. ... न असणें इष्ट आहे. ... ले. क. ई. ... क मोठा फायदा अ... हे रजेवरून ... मध्यें आपणांस वा... मु. सेकंडक्लास ... या लोकांचें घरीं रा... एज्यु. एफ. का... बहुतेक असंभवनीय ... नेमले आणि मि ... स्त्या तिन्हाईत ठिका ... फोर्थ क्लास दि... क मोठीच होते असें ... जी हे आपले ... हां. मोठ मोठ्या शहरांत ... जागी परत आ... याचे लोकांस आपाप ... जेव्हां रेसि... नत नसल्यामुळें क्लबा... किंवा जुलमाचें ... पुण्यास व मुंबईस या ... आफ रेजिस्ट्रेशन ... पूर्वीं लिहिलेंच आहे ... तो की परत ... वती व अकोला येथें ... केला आहे. ... दिवसां पासून केलेली कदा... मि. कार्डी ... स माहीत असेल अशा ... यांस तारीख ... श म्हटला म्हणजे एक... महिन्याची रजा ... च्या गाठी घेणें इतकाच ... हैद्राबादेहून सि... दिवस श्रम करण्यांत ... मि० कार्डी ... न कांहीं तरी मनास ... पेनशन घेणार ... गास व्यायाम घडेल अशा ... नि. ए. डी... हाही हेतु अनायासें ... आक्रिमिवे सु० ... सिद्धीस नेतां येतो. आ... ह्मणतात. ... आकोल्यांचे क्लबांत ...

वार्षिक आ... ऊ
सहामाही
साल अखेर
किरकोळ अंकास

VOL. XXI
वर्ष २१

# अकोला वऱ्हाडसमाचार तारीख ७ माहे नोवेंबर सन १८८७ इ०

Per annum in advance 5 Postages 13 as.
arrears 7 „ 1R. 8 as.
......... 3 „ 8 as.
4 as.

NO 44.
अंक ४४.

Advertisements.
Below 10 lines...
Per line over 10...4a
Repetition per line 3as

नोटिशीबद्दल
१० ओळींचे आं...
पुढें दर ओळीस
दुसरे खेपेस......

[illegible] ...टेचें उत्पन्न दिव- ...वाढत चालले आहे. ...न्न ३५ लक्ष रु० ...या अजमासाप्रमाणें ...लक्ष वसूल झाले. ...; गहूं फ्रान्स देशां- ...तो असें समजतें. ...वारी ता. १७ डि- ...थें पोंचणार असें

...दरवेशी लोक ...; परंतु त्यांनां प- ...लीच्या आसपास ...जमल्याचें सपजतें. ...ल आन हुमायन- ...करितां ५००० ...कोर्डरी यांच्या ...न्ट होणार असें

सु. प.

...सांवर रेलवेच्या ...डी चालु असतां ...या डब्यांत शिर- ...स्त्रियांच्या आंगा ...विचाऱ्या अबला ...नीं दागिने काढू- ...रंतु त्यांत एक ...त्यांचे बरोबर ब- ...अपून ते सशस्त्रा ...रीस बरेंच ज- ...सतांच ते उड्या ...आहे.

... पाठ शाळेंत ...लागले आहेत. ...थानच्या माजी ...येथील वकिला ...असें एक पत्र-

...गावर इटलीचा ...विण्याचा त्या-

...रांची आहुते— ...एका तोतया ...नें सामनाकरू- ...व्या दोवां पुन- ...राजा तर पळू ...व क्यापटन रे- ...मगार मारले

शु. सू.

...दयाळू महारा- ...असें ऐकतों. ...शिकत आहेत. ...व्या आनंदाची ...या चक्रवर्तीनी- ...तांत एक वे- ...सर्व प्रजेस ...व तेथील लो- ...प्रत्यक्ष अनुभव ...सआफ वेल्स ...कीय थाटांनीं ...असेलच; परं- ...य तील पैशां-

...ची उवळपट्टी व लोकांच्याही पैशांची उवळपट्टी होऊन, शेवटीं 'वेताळ पूर्व स्थलीं गेले, इतकें मात्र झालें. तसें आमच्या महाराणीच्या आगमनापासून न होवो अशी आमची परमेश्वरापाशीं फार फार प्रार्थना आहे.

ते. मि.

वेळगांव जिल्हा संपगांव तालुक्यांत एके गांवीं सहा एकर सुमार जमीनीत विस्तवाचा पाऊस पडून त्या जमीनींतील पीक जळाल्याचें समजतें. खरेंच कां ?

क०.

गदग आणि रोणाकडे पटकीचा आजार फैलावल्याचें समजतें.

खंडाळ्याहून आलेल्या बातमीच्या द्वारें असें समजण्यांत येतें कीं, निजाम हैदराबाद येथील रेसिडेंट साहेब मिस्तर कॉडरी साहेब हे खंडाळें येथें आले आहेत. त्यांचे समागमें डाक्टर लारी साहेब ही आहेत. बहुशा नोवेंबरच्या पहिल्या तारखे पावेतों येथें येऊन दाखल होतील.

टोळ व पतंग— ह्यांनीं जयपुरास मोठी नासाडी मांडिली आहे. त्या योगानें दुष्काळ पडेल कीं काय अशी भिती आहे. याची ताबडतोब कांहीं तजवीज झाली पाहिजे.

मुंग्याचा पाऊस—एका इंग्लिश पत्रावरून असें कळतें कीं, नान्सा येथें मोठाल्या मुंग्यांचा पाऊस पडला. यावर लिबरल कर्ते म्हणतात :—यांत नवल कांहींच नाहीं. कारण कधीं कधीं आपण कुत्र्या मांजरांचा पाऊस पडलेला पहात नाहीं काय?

पण इंग्लिशमन ...रे पत्रें अगदीं जळफळत आहेत. नो...व पत्रांचें वजन दिवसेंदिवस वाढत आहे, व ब्रिम्स प्रकरणांत तर अमृत बझार पत्रिकेस पूर्ण यश आलें तेव्हां पायोनिअर इंग्लिशमन यांना सळो कीं पळो झालें आहे. एकदां या राजद्रोही पत्रकारांना सहा सहा महिन्यांची शिक्षा व दोनें तीन हजार रुपये दंड केल्या वांचून त्यांचे डोळे उवडणार नाहींत व सरकारची निंदा बंद होणार नाहीं, अशी इंग्लिशमनची सूचना आहे. या सूचनेचा सरकार विचार करील इतकें तें मूर्ख नाहीं. व ज्या दिवशीं तें इतकें मूर्ख होईल त्या दिवशीं इंग्रजांच्या या देशांतील राज्याचीं शंभर वर्षे भरण्याचा समय समीप आला असें खास समजावें.

दर मिनिटांत सर्व जगांतील मरणाची सरासरी ६७ व जन्माची ७० या प्रमाणें पडते.

न्या० सिं०

## नोटीस.

रा० माधवराव नारायण गद्रे वकील राहणार धुळें जिल्हा खानदेश. यांस खाली सही करणार यांजकडून कळविण्यांत येतें कीं तुमचे रुपये गहाणावर तीन हजार असोन त्या गहाणाच्या फेडीत आपल्यास ३५-१५ ०१२०१० वसूल सन १८८४ चे दिजबर पर्यंत पावलें आहेत एकंदर व्याजासुद्धा हिशोब पाहतां सन १८८५ चे मे अखेर रुपये ४९९ देणें निघतात. ते घेऊन दोन्ही गहाण खतें काढून द्यावींत आशा बद्दल आपल्यास सन १८८५ चे जून पासून कळवीत अहोत परंतु अद्याप पावेतों आपण कांहींच केलें नाहीं याजकरितां सन १८८५ चे जून पासून सदरील ४९९ रुपयांचें व्याज मिळणार नाहीं. आणि ही नोटीस पावल्या तारखेपासून आठदिवसांत रुपये ४९९ घेऊन जावेत व दोन्हीं गहाण खतें काढून द्यावींत असें तुमचेकडून न झाल्यास नोटिशीचा खर्च व फिर्यादी संबंधी कोर्ट खर्च तुम्हावर पडेल तारीख ४ माहे नवंबर सन १८८७ ईसवी.

सही.

सदाशीव व दामोदर आणि श्रीधर हरी हर दिक्षीत पाटणकर. जाहगीरदार शेंदुरणी. दस्तुर खुद्द.

## नोटीस.

रा. रा. तुकाराम मैराळपाळ साहु राहणार बारासिव्ह जिल्हा नळदुर्ग यांस नोटीस देणार उमरावसिंग ललुसिंग वल्द धनसिंग जमादार राहणार पातूर सेखबाबू तालुके बाळापूर जिल्हा अकोला नोटिशीनें असें कळविलें जातें कीं, तुह्मापाशीं आमचे बंधु नामें सरदारसिंग वल्द धनसिंग जमादार यांनीं आमच्या येथील मोठी तिजोरी ज्यांत उत्तम उत्तम मोठ्या मोठ्या किमतीची पांच रुणें व सोन्या चांदीचे व मोत्याचे वगैरे दागदागीनें किंमत अदमासें रुपये २९,००० किंवा ३०,००० हजारांचे आंत आहेत अशी मोठी तिजोरी आपल्या जवळ सदरील आमचे बंधु सरदारसिंग यांनीं ठेविली आहे. व त्या तिजोरीची किल्ली सरदारसिंग याजपाशीं आहे. या करितां आपल्यास असें कळविलें जातें कीं, सदरहू मोठी तिजोरी आमच्या शिवाय आपण सरदारसिंग यांस देऊंनये. दिल्यास त्याज बद्दलची सर्व जबाबदारी आपल्यावर आहे. व देऊन जी नुकसानी वगैरे होईल ती आपल्या पासून कांहीं एक सबब न ऐकितां कोर्टांत दावा करून अखेर निकाल होई पर्यंत जें नुकासान वगैरे होईल तें आपले पासून भरून घेतलें जाईल.

ताजाकलम—आमचे वडील चुलत बंधु नामे भवानीसिंग वल्द लक्ष्मणसिंग जमादार यांणीं सदरील तिजोरी बद्दल खुलासा विचारला होता त्याजबद्दल आपण वहीखात्याचा जमा खर्च त्यांस दाखऊन आपण त्याजपाशीं त्यांच्या हुकुमाशिवाय तिजोरी कोणास देणार नाहीं म्हणून आपण त्याजपाशीं कबूल केलें आहे हें आपणांस कळावें तारीख ४ माहे नोवेंबर सन १८८७ इ०

( सही )

उमरावसिंग धनसिंग जमादार व ललुसिंग वल्द धनसिंग जमादार दस्तुर खुद्द रिसाला ४ घवधा.

## नोटीस.

रा. ग. अनंदरूप कस्तुरचंद साहू दुकान जालना उर्फ कादराबाद यांस नोटीस देणार उमरावसिंग ललुसिंग वल्द धनसिंग जमादार रहाणार पातुर शेखबाबु. नोटिसीनें असे कळविलें जातेंकीं तुमचें दुकानी आमचे वडील नामे धनसिंग वल्द गुलाबसिंग जमादार रीसाला चवथा यांणीं ठेव रुपये अदमासें २५१३० हजाराची व्याजी ठेविली आहे. त्यांपैकीं आपल्या कडून आम्हांस पांच काय ती खाली लीहिल्यां प्रमाणें.

१ जडावाच्या कड्याची जोडी वाघाच्या तोंडाची किंमत अजमासे रुपये ७००० हजार.

२ गलोत जडावाचा रुपये अजमासे तीन ३०

३ सिरपूर दुकानावर ...ची त्यांचे रुपये आह्मांस ...नाहींत व ती हुंडी आह्मापा... सदरील जडावाच्या कडू... लोत जडावाचा हे दोनच ...च्या किमती मिळून आ... ००० वडिलास काय ते. ...वांपैकीं मिळालें व आतां ...कीची ठेव व त्याचें व्याज झालें असेल तें आपण आ... शिवाय सरदारसिंग किंवा त्य... सदाशिव सोनाजी महाजन देऊं नये. दिल्यास एकंदर नुक... अखेर निकाल होई पर्यंत ...होईल तें आपल्या पासून चालवून भरून घेतले जाईल... ४ नोवेंबर सन १८८७ इ.

( सही )

उमरावसिंग धनसिंग ...सिंग धनसिंग ...

## नोटीस.

मे० सरदारसिंग वल्द ध...दार रहाणार पातुर सेखबाबु देणार उमरावसिंग ललुसिंग जमादार रहाणार पातुर सेखबाबु असें कळविले जातेकीं आपण म्हांपासून निराळे रागावून निघे तुम्हो व तुमचें कुटुंब आणि नो मिळून आदमासे विस ह... पुर्जे शिवाय अदमा... रुपयांचे कडे आणि तोन हजार मास जडावाचे व मोत्याचे गलोत कडे मोत्याचे पदर अदमास मिळू... सोन्याचांदीचे दागदागिने आद... १५,००० पंधरा हजारांचे शि... आदमासें २४,०० येणें प्रमा... माल आमचे समक्ष काढून नेला हवेलींत जो रोकड वडिलोपार्जित ...डिलांनीं गाडलेली आहे तो, या... सून ती हवेली बंद आहे. वरी... इस्टेट तुम्हो आमचे समक्ष क... गांवांत लोकांपाशीं छपावून ठे... सर्व इस्टेट चार संभावीत लोकास... हिशेरशी प्रमाणें आमची आम्हास... तुह्मो सदरील इस्टेट ज्या ज्या गृहस... पाशी ठेविली आहे त्यांची तपशीलवार निशी आह्मांजवळ आहे तर आपण ...माणें आह्मांस व चार पंचास आणून प्रमाणें वाटून द्यावी. न दिल्यास आप... रीतीप्रमाणें कोर्टांत काम चालून अखेर... ल होईपर्यंत जें नुकसान होईल तें ...तलें जाईल कळावें. तारिख ४ मा... सन १८८७ इसवी.

सही उमरावसिंग धनसिंग जमा...

ललुसिंग धनसिंग
द

...एकमेकांनीं एकमेकांचे व ...ज्या अशी वहिवाट होती अद्यापही चालू आहे. प- ...ह्मणविणाऱ्या मंडळींनीं ...गंतीचे रोजची भेट बहुते- ...चा प्रयत्न चालविला आ... ...पर्यंचा प्रयत्न सफल आहे. ...का समाजापैकीं व्यक्ति ...नें वागणारे, रीतीभाती ...से आहोत तर आपणांस ...आहेच. सामाजिक ...जे ज्या प्रमाणानें स- ...वर्तन बरें वाईट असेल ...थाची. एका समाजांतील ...मुळें आपणांस नित्य ...हिजे, व एकमेकांचे वि- ...नास्त दळणवळण वा- पाहिजे. आतां जुन्या ...त गाठी पडून ह्मणा ...माणें कुटुंबांत जमून ह्म- ...म्हेनें एकमेकांचे दळण ...हे हें उघड आहे. अर्था- ...आहे तर हल्लींचे कुटुं- ...कोणीं वाढणें इष्ट आहे. ...कांचें एकमेकांचे सं- ...प्रकारचें असावें वगैरे ...विचार करणार आहों. ...गांव लाहान असेल ...देवळीं जमण्याची व- ...व्यवस्था व्हावी असा ...नाहीं. ज्या ठिकाणीं ...जोगे असेल म्हणजे ...जाणारे पुष्कळ लोक ...जाणेंही दुरापास्त ...असणें इष्ट आहे. ...मोठा फायदा अ- ...मध्यें आपणांस वा- ...ल्या लोकांचें वरीं रो- ...बहुतेक असंभवनीय ...तिन्हाईत ठिका- ...मोठीच होते असें ...ठ मोठ्या शहरांत ...लोकांस आपापसां ...नसल्यामुळें कुटुं- ...ासास व मुंबईस या ...पूर्वीं लिहिलेंच आहे; ...ती व अकोला येथें ...सां पासून केलेली कदा- ...माहीत असेल अशा ...म्हटला म्हणजे एक- ...या गाठी घेणें इतकाच ...दिवस श्रम करण्यांत

हें पत्र आकोला येथें ... कांहीं तरी मनास खंडेराव बाळाजी फडके यांचे "रोगस व्यायाम घडेल अशा घार" छापखान्यांत नारायण ... हाही हेतु अनायासें यांनीं छापून प्रसिद्ध केलें. ...सिद्धीस नेतां येतो. आ- ...च्या आकोल्याचे कुटुंबांत व

[illegible]

वर्षाची आ॰ ऊ॰ रु॰ ५ डांकहशील ०।३
शाहामाही " ३ " ०८
साल अखेर " ७ " १०।८
किरकोळ अंकास ....................०४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु. १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस........०१

Per annum in advance 5 Postages 13 as.
Per annum in arrears 7 „ 1R. 8 as.
Six monthly ........... 3 „ 8 as.
Single copy ........................... 4 as.

Advertisements.
Below 10 lines...
Per line over 10...4s
Repetition per line 3as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL. XXI. AKOLA MONDAY 14 NOVEMBER 1887. NO 44.
वर्ष २१ अकोला सोमवार तारीख १४ माहे नोवेंबर सन १८८७ इ० अंक ४४.

### नोटीस.

रा॰ रा॰ यशवंतराव भगवंतराव देशमूख मौजे स्वस्ती तालुके बाळापूर यांस खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुमचा रुसुमाचा पैसा सन १२९४।९५।९६ ह्या तीन सालचा घेऊन जावा ह्मणून तुह्मांस दोन नोटिसा दिल्या असून त्याप्रमाणें तुह्मी अम्मल न करितां विनाकारण खर्चाबद्दल आह्मांस नोटीस दिली तरी जो पूर्वींपासून वडिलोपार्जित खर्च चालत आला आहे तो खर्च देणें रास्त असून आपण देतही आलां सांप्रत कोणताही खर्च मंजूर नाहीं ह्मणजे लिहितां हें तुमचें ह्मणणें गैर आहे आतां तुमचा पैसा सावकाराचे येथें जमा असून तुह्मी फिर्यादी वगैरे कराल तो खर्च आह्मी देणार नाहीं तुह्मांस सोसावा ल.ग.ऊ. कळावें. तारीख ६ माहे नोवेंबर सन १८८७ इसवी-

( सही ) दवलतराव फत्तेसिंग देशमूख ता लुके बाळापूर

दस्तूर खुद.

## लेडी डफरिन फंड.

( ज्युबिलीची वर्गणी )

महाराज.

गेल्या जानेवारी महिन्याच्या पहिल्या तारखेस आपण कृपा करून आमचें पत्र प्रसिद्ध केलें. या पत्रांत आम्हीं न्याशनल असोशिएशनच्या सभासदांस, व त्या सभेच्या कामांत कळकळ बाळगणाऱ्या इतर गृहस्थांस, महाराणी साहेबांच्या ज्युबिलीच्या उत्सवाचें कांहीं विशेष रीतीनें स्मारक करण्याच्या खटपटीस आम्हांस सहाय्य होण्या करितां व ज्यांचें कल्याण होण्याकरितां माहाराणी साहेब स्वतः अतिशय काळजी वाहतात अशा हिंदुस्थानांतील स्त्रियांस कांहीं लाभ होण्या करितां ही विनंती केली होती.

हा बेत सिद्धीस नेण्या करितां जी व्यवस्था करण्यांत आली, ती येथें पुन्हां कळविण्याचें प्रयोजन दिसत नाहीं. वर्गणी जमा करण्याचें काम आतां संपलें, तेव्हां आपल्या पत्रद्वारें या कामांत आलेल्या यशा विषयीं व जमा केलेल्या रकमास संबंधी कांहीं हकीकत, ज्यांनीं या कामीं कळकळीनें मदत केली अशा गृहस्थांस कळविल्यास आम्हांस फार संतोष होईल. तारीख १९ अक्टोबर सन १८८७ रोजीं ज्युबिली प्रीत्यर्थ वर्गणीची व देणग्यांची यादी आम्हांस बंद करावी लागली. त्या दिवशीं ४७८४६९ रुपयांची रकम हिंदुस्थानांतून व १७७९ पौंड इंग्लंडांतून आमचे कडेस जमा झाले. यावरून आपल्या ज्युबिली प्रीत्यर्थ गोळा केलेली रकम ५ लाखाहून अधीक आहे हें ध्यानीं येईल.

या पैकीं ३। लाखरुपये मोठमोठ्या देणग्यांच्या रूपानें आले व बाकीची रकम कार्डांवर ज्या लहान लहान वर्गणीच्या रकमा जमा करण्यांत आल्या त्यांची बेरीज आहे ही वर्गणी जमा करण्यांचे कामांत या असोशिएशनच्या बहुतेक शाखांनीं निरल सतेनें मदत केली. तारीख १ ज्यानेवारीचे पत्रांत निर्दिष्ट केलेल्या नियमा अन्वयें ७५९२५ रुपये निरनिराळ्या शाखांस देण्यांत आले आहेत. मोठ मोठाल्या देणगीदारांस व लहान लहान वर्गणीचे पैसे जमा करणारांस आम्हीं पावत्या पाठविल्या आहेत. व त्या योगानें एका प्रकारें त्यांच्या दाक्षिण्याबद्दल उपकार मानिले आहेत व त्यांचे उदारतेची नूंद ठेवितां आली. परंतु ज्या हाजारों लोकांच्या एक आण्यापासून १०० रुपया पर्यंत दिलेल्या वर्गणीनें ज्युबिली फंड एवढा मोठा फुगला, व ज्यांचीं नांवें इतरांच्या कार्डांवर असल्यामुळें आद्याप पावेतों त्यांचे आभार मानितां आले नाहींत, आशा लोकांस आम्हीं त्यांचे अंतःकरणपूर्वक किती आभारी आहों हें ह्या प्रसंगीं कळवितों.

देणगीदारांची व वर्गणी जमा करणारांचीं यादी बादशाहिणी सरकाराकडे पाठविण्या करितां तयार होत आहे. ती यादी व राणी साहेबांस पाठविलेलें मानपत्र वर्गणी दारांच्या माहितीस्तव १८८८ च्या जानेवारींत न्याशनल असोशिएशनच्या रिपोर्टांत प्रसिद्ध होणार आहे. येथें आम्हांस हेंही सांगितलें पाहिजे कीं, जरी हें पत्र ज्युबिली निमित्त वर्गणी संबंधीं व आमचे हातीं जी रकम आली त्या संबंधींच आहे तथापि आम्हीं यांत जर सुमार्गी यंत्रित यत्नांचा व स्त्रियां करितां दवाखानें स्थापन करण्यास्तव ज्या मोठमोठ्या रकमा खर्चीं पडत आहेत त्यांचा आणि न्याशनल असोशिएशनाचा व माहाराणीच्या ज्युबिली स्मारकांचा ज्या कृत्यांशीं संबंध आहे अशा कृत्यांचा उल्लेख न केल्यास, हें पत्र अपुरेंच राहील. या गोष्टी राणीसरकारचे नजरेस आणल्या जातील. व वार्षीक रिपोर्टांत याविषयीं तपसीलवार हिशेब दिले जातील.

या प्रसंगीं कार्डाच्या योगानें पैसा जमविण्याची पद्धत सुरू करण्यांत आ[illegible] व ती खरोखर फलद्रूप झाली. या योगानें असें सिद्ध झालें आहे कीं,हजारों लोक असोशिएशनच्या कामीं कळकळ बाळगतात,व असेंही दृष्टोत्पत्तीस आलें आहे कीं या सोप्याशा व्यवस्थेनें हजारों लोकांना खुषीनें देतां येतील. अशा लहान लहान रकमांच्या योगानें लाख दीड लाख रुपये जमा करितां येतात, यास्तव सेंट्रल फंडाच्या फायद्या करितां सदर्हू पद्धत सुरू ठेवूं परंतु या सालानंतर निरनिराळ्या शाखां करितां पैसा वसूल करण्याची जबाबदारी आह्मांस घेतां येणार नाहीं.

सेंट्रल कमिटीस ५ लाख रुपये व्याजीं लावितां आले आहेत. सदर्हू रकम नेमणुका दाखल निराळी राखून ठेवण्याची कमिटीस फारच उत्सुकता होती. न्याशनल असोशिएशनचें काम नेहमीं चालेल असा पक्का बंदोबस्त करण्या करितां निरनिराळ्या शाखा देखील पैसा व्याजी लावण्याची खटपट करीत आहेत. पुढल्या वर्षीं औदार्य दाखविण्यास जरी कांहीं विशेष कारण नाहीं तथापि आह्मांस भरंवसा आहे कीं असोशियनचे हेतु सिद्धीस नेण्यास आजपर्यंत झालेले यत्न व आमच्या हातीं असलेल्या रकमेनें आलेली शाश्वती या योगानें हिंदू स्त्रियांच्या कल्याणास्तव कळकळ बाळगणाऱ्या गृहस्थांस ज्यास्त परिश्रम करण्यास स्फुरण येईल, व असें झालें असतां हिंदू स्त्रियांची दुःखापासून मुक्तता करण्यास आज साध्य नसलेली औषधोपचाराची मदत करण्यास झटण्या करितां अधिक उत्तेजन येईल.

आपली नम्र सेवक

( सही )हारि एट डफरिन.

न्याशनल असोशियनच्या लेडी प्रेसिडेंट.

---

वऱ्हाडसमाचार.

---

मिती कार्तिक वद्य १४ शके १८०९

## आमच्या अकोल्याचे व उमरावतीचे क्लबांची स्थिति.

आमचे बाहेर गांवचे वाचकांस 'क्लब' या शब्दाचा अर्थ हा शब्द इंग्रजी असल्या मुळें कदाचित् माहीत नसेल. क्लब ह्मणजे एकत्र जमून आपला वेळ मनोरंजन होण्याजोग्या गोष्टी करण्याचें स्थान एवढाच तूर्त दिला तरी बस आहे. अशा प्रकारचें मंडळी जमण्याचें क्लब मुंबई, पुणें, वगैरे मोठाल्यां ठिकाणीं मुंबई इलाख्यांत आहेतच क्लबाची मुळची कल्पना इंग्रज लोकांची व इतर युरोपियन लोकांची आहे. या देशांत अशा प्रकारानें एके ठिकाणीं जमून गमतीनें वेळ घालविण्या करितां जाणून मुद्दाम योजना आढळात नाहीं. पूर्वीं गांवांतील लोकांच्या भेटी रोजचे रोज बहुतेक गांवांतील मारुतीचे देवळांत अगर सांभाचे देवळांत अगर दुसऱ्या एखाद्या देवळांत होत असे. ह्मातारे ह्मातारे लोकांनीं देवळांत पुराणा साठीं किंवा निदान देवदर्शना साठीं जाऊन एकत्र जमल्यानें रोजच्या रोज लोकांच्या गाठी पडत असत. तसेंच वार्षिक प्रसंगा ह्मणजे दसऱ्याचे दिवशीं अगर तिळ संक्रांतीचे दिवशीं एकमेकांनीं एकमेकांचे घरीं जाऊन भेटी घ्याव्या अशी वहिवाट होती व ती थोडी बहुतेक अद्यापही चालू आहे. परंतु हल्लींचे सुशिक्षित ह्मणविणाऱ्या मंडळींनीं दसऱ्याचे अगर संक्रांतीचे रोजची भेट बहुतेक संपुष्टांत आणण्याचा प्रयत्न चालविला आहे व कांहीं अंशीं त्यांचा प्रयत्न सफल आहे. आतां आपण जर एका समाजापैकीं व्यक्ति आहोंत व एका धर्मानें वागणारे, रीतिभाती सारख्या असणारे असे आहोंत तर आपणांस एकमेकांची गरज आहेच. सामाजिक स्थिति ह्मटली ह्मणजे ज्या प्रमाणानें समाजांतील व्यक्तीचें वर्तन बरें वाईट असेल त्या प्रमाणानें असावयाची. एका समाजांतील आपण सर्वत्र असल्यामुळें आपणांस नित्य एकमेकांस भेटलेंच पाहिजे, व एकमेकांचे विचार समजून घेऊन जास्त दळणवळण वाढेल असें वर्तन ठेवलें पाहिजे. आतां जुन्या पद्धती प्रमाणें देवळांत गाठी पडून ह्मणा किंवा नव्या पद्धती प्रमाणें क्लबांत जमून ह्मणा कोणत्या तरी तऱ्हेनें एकमेकांचें दळण वळण वाढणें इष्ट आहे हें उघड आहे. अर्थात जर ही गोष्ट इष्ट आहे तर हल्लींचे क्लबासारखे समाज ठिकाठिकाणीं वाढणें इष्ट आहे कीं नाहीं व तेथील लोकांचें एकमेकांचे संबंधानें वर्तन कोणत्या प्रकारचें असावें वगैरे संबंधानें आज थोडासा विचार करणार आहों.

ज्या ज्या ठिकाणीं गांव लाहान असेल त्या ठिकाणीं पूर्वापार देवळीं जमण्याची वहिवाट मोडून क्लबाची व्यवस्था व्हावी असा आमचा मुळींच उद्देश नाहीं. ज्या ठिकाणीं क्लबाची स्थापना होण्या जोगे असेल म्हणजे ज्या ठिकाणीं देवळांत जाणारे पुष्कळ लोक नसून एकमेकांचें घरीं जाणेंही दुरापास्त होतें अशा ठिकाणीं क्लब असणें इष्ट आहे. क्लब असल्या पासून एक मोठा फायदा असा आहे कीं ज्या लोकांमध्यें आपणांस वागण्याचा प्रसंग आहे त्या लोकांचें घरीं रोजचे रोज जाणें म्हणजे बहुतेक असंभवनीय असल्या मुळें क्लबा सारख्या तिऱ्हाईत ठिकाणीं जमण्याची सोय एक मोठीच होते असें म्हणण्यास हरकत नाहीं. मोठ मोठ्या शहरांत एकमेकांचे घरीं जाण्याचे लोकांस आपापल्या कामधंद्यामुळें बनत नसल्यामुळें क्लबें, होणें फार इष्ट आहे. पुण्यास व मुंबईस या प्रमाणें क्लब असल्याचें पूर्वीं लिहिलेंच आहे व वऱ्हाडांतही उमरावती व अकोला येथें क्लबाची योजना बरेच दिवसां पासून केलेली कदाचित आमचे वाचकांस माहीत असेल अशा समाजांचा मुख्य उद्देश म्हटला म्हणजे एकत्र जमणें व एकमेकांच्या गाठी घेणें इतकाच बहुतेक नसतो. सारा दिवस श्रम करण्यांत घालवून क्लबांत जाऊन कांहीं तरी मनास गमंत वाटेल व शरीरास व्यायाम घडेल अशा प्रकारचे खेळ खेळणें हाही हेतु अनायासें एकत्र जमल्या मुळें सिद्धीस नेतां येतो. आतां हे हेतु आमच्या आकोल्याचे क्लबांत व

उमरावतीचे क्लबांत असल्या प्रकारचे मनोरंजन होण्यासारखे अगर शरीरास व्यायाम होण्यासारखे काय काय प्रकार चालतात या विषयीं थोडी माहिती देऊं. आमच्या अकोल्याचे क्लबांत मंडळी एकत्र जमतात खरी, परंतु बहुतेक वेळ गप्पांत व पान तंबाखू खाण्यांत जातो. महिन्यांतून दोनचार वेळ गायनादि प्रकारही होतात. नुसतें मंडळीनीं एकत्र जमणें इष्ट आहे या उद्देशानेंच केवळ क्लबासारख्या ठिकाणीं लोक जात नाहींत असा अनुभव आहे; म्हणून क्लबासारख्या ठिकाणीं कांहीं तरी मनोरंजनाचें साधन अवश्य पाहिजे; ह्मणजे लोकांचें मन साहाजिक आकर्षण होतें व एकमेकांच्या भेटी होतात. कदाचित कित्येकांचा असा अक्षेप असेल कीं सारा दिवस थकून आल्यानंतर कोणतेंही काम करण्याची उमेद मुळींच रहात नाहीं म्हणून गप्पा मारतां मारतां वेळ घालविण्यासारखी उत्तम युक्ति दुसरी नाहीं. गप्पांत गेलेला काळ उपयोगास लागला असे तर अर्थांत कोणी म्हणणार नाहीं; परंतु मनोरंजन व व्यायाम या दोन्ही गोष्टी साधणाऱ्यांना जर कांहीं करितां आलें तर खचित फार बरें असें सर्व कबूल करतील. उमरावती येथील क्लबांत प्रथमतः क्लब स्थापन झाल्यावर बरेच दिवसपर्यंत पुष्कळ मंडळी त्या क्लबांत तेथील वर्गणीदार असूनही जात नसत व कित्येक तर त्या ठिकाणीं कांहींच मनोरंजन अगर शारिरिक व्यायाम हो ण्याचें साधन नसल्या मुळें वर्गणीदारच नव्हते. परंतु ही उणीव कांहीं दिवसां पूर्वीं दूर करण्यांत येऊन क्लबाचे आवारांत एक खेळण्याचा आखाडा तयार करून तेथें 'लान्टेनिस' म्हणून इंग्रजी पद्धतीवर खेळ सुरूं केला आहे. हा खेळ झाल्या पासून क्लबांत मंडळीची संख्या नित्य येणारी जास्त झाली आहे व अर्थांतच त्यास तितकी क्लबांत येण्याची उत्कंठा जास्त वाढत चालली आहे. आतां खेळ खेळणें तें इंग्रजी अगर मराठी पद्धतीवर असणें हें खेळणारांचे खुषीवर आहे; परंतु कोणत्या तरी प्रकारचें शरीरास व्यायाम होणारे असें खेळ अवश्य असावेत असें आम्हांस वाटतें. नुसतें एकत्र जमून चकाट्या पिटीत बसतां बसतां त्यांत लोकांचे गुणदोषावर टीका वाजवीपेक्षां फाजील होण्याचा संभव आहे; तेंच जर कांहीं खेळण्याची वगैरे तजवीज असली तर तसें न होतां वेळ कामीं लागून शरीरास फायदा होणार आहे व मनासही विश्रांति मिळाल्या सारखी होईल. आमच्या आकोल्याच्या मंडळींनीं उमरावती सारख्या एखाद्या खेळाची योजना कां करूं नये हें आम्हांस कळत नाहीं. अशी कांहीं व्यवस्था होणें इष्ट असल्यास याबद्दल आमचे मंडळीकडून योग्य विचार व्हावा अशी आमची मनापासून इच्छा आहे.

(पुढें चालूं.)

## शिक्षक समाज.

ह्यावर्षीं शिक्षक समाजाच्या कामाची सुरुवात तारीख ९ माहे नव्हेंबर रोजीं झाली. कामाची सुरुवात मेहेरबान डायरेक्टर साहेब बाहादूर यांनीं केली. कामास आरंभ होण्याच्या पूर्वीं मे. डायरेक्टर साहेब यांनीं मनोवेधक भाषण केलें व त्या समाजानें कोणत्या कोणत्या मुख्य गोष्टी कडे लक्ष्य दिलें पाहिजे याचेंही थोडेसें दिग्दर्शन त्यांनीं केलें. डायरेक्टर साहेबांच्या भाषणा नंतर समाजाचे सेक्रेटरी यांनीं गेल्या वर्षाचा रिपोर्ट वाचून दाखविला. त्या रिपोर्टांत सेक्रेटरी यांनीं व्यक्तीस उद्देशून कांहीं लिहिलें होतें अशा विषयीं पाठीमागून बरीच चर्चा झाली. व कांहीं वेळ याचा उहापोह झाला. नंतर रिपोर्टाची मान्यता तारीख ११ रोजीं सायंकाळीं झाली. रिपोर्ट वाचल्या नंतर मे. डायरेक्टर साहेब उठून गेले व समाजाच्या कामास सुरुवात झाली. पहिला विषय शिक्षक समाजाचे फंडांतून आजपर्यंत घेतलेली पुस्तकें सर्व वर्गणी दारांकडे वाचना करितां पाठविलीं जात नाहींत सबब जागोजाग जमणाऱ्या पोट शिक्षकांच्या समाजाचा स्वतंत्र पुस्तक संग्रह असावा व पुस्तकें विकत घेण्याच्या खर्चा करितां कांहीं पैसा मुख्य शिक्षक समाजाच्या फंडांतून मिळावा हा होता. या विषयाचीं भवति नभवति पुष्कळ वेळ झाली. रा. रा. महाजनी यांनीं असें बोलून दाखविलें कीं माझ्या एका वर्षाच्या अनुभवा वरून मला असें वाटतें कीं पुस्तकें वाचावयास मिळत नाहींत ही जी शिक्षक लोकांची कुरकुर आहे त्याचें मूळ बीज शिक्षक लोकांचें वाचण्याकडे औदासिन्य हें होय. महाजनी हे स्वतः फार विद्वान् आहेत व पुस्तकें वाचण्याची त्यांना फार अभिरुचि आहे हें सर्वांस माहित आहेच. तेव्हां अशा प्रकारचे उद्गार त्यांनीं काढणें हें अगदीं साहजिक आहे; व त्यांच्या म्हणण्या कडेस सर्वांनीं लक्ष्य देणें हेंहीं अगदीं अवश्य आहे. नंतर अध्यक्षानींही तीच गोष्ट सांगून या पहिल्या विषयाचा निकाल केला. नंतर रा. रा. गोविंद नारायण चिकाटे हेड मास्तर अ० व्ह० स्कूल बाळापूर यांनीं "आमच्या शाळांतील नीति शिक्षण" या विषयावर निबंध वाचला. निबंध फार मनोवेधक सुरेख व बोधपर होता. त्यांच्या लिहिण्याचा सारांश हाच होता कीं, अंशतः धर्म संबंधानें व अंशतः जाति भेदामुळें नीति शिक्षण शाळांत देण्याचें काम फार कठीण आहे. तथापि विद्यार्थी जनांचें आचरण व विचार सुधारण्यास कांहीं प्रकारचें नीति शिक्षण देणें जरूर आहे. व नीति शिक्षणाची जबाबदारी शिक्षकांवर आहे. या विषयाची चर्चा तेथें बरीच झाली. ह्या विषयींचे आमचे विचार पुढील अंकीं आम्ही देऊं. निबंध झाल्या नंतर रा. रा. चिमणाजी माधव अ० मा० अ० व्ह० स्कूल मोर्तिजापूर यांनीं सहाव्या ईयत्तेंतील मुलांस एक शास्त्रीय विषया वरील धडा शिकवून दाखविला. आतां वर्ग शिकविणें ह्या संबधानें आम्हीं दोन शब्द येथें लिहितों. विद्या खात्याचा मुख्य उद्देश मुलांस शिक्षण देणें हा होय. हें शिक्षण चांगलें किंवा वाईट हें त्या शिक्षकाच्या शिक्षण पद्धतीवर अवलंबून असतें. शिक्षकांस एखादा विषय चांगला समजणें व तोच विषय चांगला शिकवून दाखविणें ह्या गोष्टी अगदीं निरनिराळ्या आहेत. शिक्षक हा विद्वान् असूनही त्याला शिकवितां येत नाहीं असें पुष्कळ वेळां दिसून येतें तरी विद्वत्ता व विवरणशक्ति ह्या दोन्ही गोष्टी शिक्षकांस फार अवश्य आहेत. शिक्षकांची शिक्षण पद्धति सुधारण्यास समाजा पुढें वर्ग शिकवून दाखविणें हें एक उत्तम साधन आहे. आतां हा उद्देश चांगल्या रीतीनें सफळ होण्यास चांगले विद्वानांनीं व अनुभवशीर गृहस्थांनीं शिकविण्याचें काम आपण पत्करिलें पाहिजे.

मे. डायरेक्टर साहेब "वर्ग शिकवून दाखविणें" ह्या गोष्टीकडे फार लक्ष्य देतात ही फार अभिनंदनीय गोष्ट आहे. शेवटी उद्धवराव मोटे फ. अ. मा. ॲ. व्ह. स्कूल कारंजे यांनीं कविता कशी शिकवावी, हे दाखविलें व सभा विसर्जन झाली. तरिख १० रोजीं रा. त्रिंबकराव भिडे थ. अ. मा. अ. व्ह. स्कुल यवतमाळ यांनीं "मोडी लेखन" याविषयावर एक निबंध वाचला. ह्या निबंधांत वास्तविक ग्राह्य अशा पुष्कळ गोष्टी आहेत. व असे उपयुक्त निबंध छापून प्रसिद्ध झाले तर बाकीच्या लोकांस फार फायदा होईल. अशा संबंधाची एक सूचना शेवटच्या दिवशीं केली होती त्या सूचनेचा पूर्ण विचार करून 'प्रमोदसिंधु कर्ते व वैदर्भ कर्ते' यांनीं आपण होऊन आम्ही असें उपयुक्त विषय छापूं अशी इच्छा प्रदर्शित केली. खरोखर ही गोष्ट सार्वजनिक हिताची आहे; आमच्या बंधुनीं ही सार्वजनिक गोष्ट करण्याचें पत्करिलें ही गोष्ट फारच आनंद मानण्यासारखी आहे ह्यांत कांहीं संशय नाहीं. निबंध वाचल्यानंतर मोडी लेखनास उत्तेजन देण्या करितां समाजाच्या फंडांतून विद्यार्थ्यांस बक्षिसें देण्यांत यावीं अशी सूचना सेक्रेटरी यांजकडे आली होती. तिचा पूर्ण विचार समाजानें करून असें ठरविण्यांत आलें कीं प्रत्येक जिल्ह्यातून सहा सहा उत्तम मराठी लेखनाचे नमुने डेप्युटी इन्स्पेक्टराच्या मार्फत समाजाकडे यावेत व समाजानें एक कमेटी नेमून त्यांस ३६ रुपये किंमतीचीं बक्षिसें समाजाकडून देण्यांत यावीत. वास्तविक पाहिलें असतां अलीकडे इंग्रजी विद्येचा प्रसार होत असल्यामुळें मोडी लेखना विषयीं फारच अनास्था उत्पन्न झाली आहे. मोडी लेखन व्यवहारांत फार उपयुक्त आहे व त्या विषयीं लोकांची इतकी अनास्था होत जाणें ही फार शोचनीय गोष्ट आहे. सबब ह्या गोष्टीकडे समाजानें लक्ष्य देणें जरूर होतें. व त्या प्रमाणें त्यांनीं उत्तेजनार्थ आपल्या फंडांतून ३६ रुपये पुढच्या वर्षीं देण्याचें कबूल केलें, ही फारच आनंदाची गोष्ट आहे. नंतर रा. रा. कृष्णाजी मल्हार पैठणकर यांनीं "हिंदुस्थान सपन्न होण्याचीं कारणें काय?" ह्या विषयावर एक निबंध वांचला. निबंधाची भाषा सरणी फारच उत्तम होती. व माहिती ही फारच उपयुक्त होती. प्रथमारंभी त्यांनीं हिंदुस्थानच्या संपत्तीचीं नैसर्गिक साधनें सांगितली व सृष्टी वैचित्र्यामुळें लोकांच्या आचारावर, विचारावर, काय परिणाम घडले आहेत हें सांगून नंतर युरोपांतील संपत्तीची साधनें व तेथील सृष्टिवैचित्र्यामुळें तेथील लोकांचा वर्तनक्रम वगैरे गोष्टी हिंदुस्थानच्या स्थितीहून अगदी भिन्न आहेत हें व्यक्त केलें. हिंदुस्थानची सांप्रतची स्थिती निकृष्ट होण्याचें मुख्य कारण तेथें अनुभवजन्य शास्त्राच्या अभ्यासाचा अभाव हें होय. सांप्रतचीच स्थिती सुधारण्यास मुख्य उपाय हाच कीं 'सृष्ट पदार्थ विषयक शास्त्रें' शिकवून लोकांचीं मनें देशाच्या नैसर्गिक साधनांकडे लावावींत म्हणजे व्यापार धंदे वाढून देशाची उन्नति होण्याचा संभव आहे. हा मुख्य त्यांचें लिहिण्याचा आशय होता.

पुढें चालूं.

The Berar Samachar

MONDAY NOVEMBER 14, 1887

## OUR SARVAJANIK SABHA DELEGATES AND THE NATIONAL CONGRESS.

Our Sarvajanik Sabha must be up and doing by this time. The people of Berar have a recognized institution and the *vox populi* is represented by the Berar Sarvajanik Sabha. The opinion of the Sabha so far as it represents the public opinion of Berar carries as much weight as it can in its in fancy; and if, as we have suggested long before, the delegates are chosen by the Sabha, it will have done its duty by the people so far as the National Congress is concerned. The National Congress is in need of representatives from all and every province of India and the value of the representative nature of the Congress is enhanced by a greater number of representatives. The cry of interested papers was, as everybody remembers, that the representatives at the Congress were a body of self-elected people who had no substantial intersts at stake, and who in fact represented nobody in the land. The cry was not only confined to papers in this country but was echoed in influential papers in England by interested wire-pullers. The dream is fast vanishing but at the same time it will be necessary to make the representative character of the delegates as patent as possible.

The Sabha has yet to choose its own delegates and we have no advice to give to the Sabha regarding the selections to be made. Perhaps, the Sabha is too well--informed as to the character of the delegates to be sent,to need any advice. The delegates however, will have to get themselves informed of all things which are to be discussed at the Congress. The Congress is a deliberative body and every member ought to give the benefit of his knowledge to the Assembly. It would be, therefore, the duty of our Berar delegates to acquaint themselves with the subjects for dis cussion, so as to be prepared in time. The Sabha might as well suggest some subjects for the consideration of the Congress through their delegates.

The remarks of Mr. Beck might be studied by the delegates with advantage. They show how the real nature of the Congress is not properly understood by strangers like Mr. Beck. Mr Beck understood that the Congress asked for a Parliament for India; but no snch presumptuous and premature demand was made by the Congress is known to all who know the true state of opinions held by the Congress. Mr. Beck's remarks are particularly useful in putting the delegates on their guard lest they might seem to make some unjustifiable demands in the heat of discussion. The Congress, it is hoped, will, this year be open to reporter's of the Press, and there is not much fear that any misunderstanding of the actual demands and opinions of the Congress would take place.

We acknowledge with thanks the

receipt of a copy of the first issue of the new weekly paper "National Guardian" published at Calcutta.

The style and tone in which the several different subjects are treated in this issue hold out a hope that the promises made by the Manager to make the paper as useful, interesting and attractive as the best papers in Europe and America are, will be fulfilled.

The rates of subscription are.—4 Rs. yearly; 2Rs. half yearly, inclusive of postage.

We wish long life and prosperity to this our new brother.

## THE COUNTESS OF DUFFERIN'S FUND.

(JUBILEE COLLECTION, 1887.)
VICEREGAL LODGE' SIMLA;
25th October 1887.

On the 1st of January of this year you were good enough to publish a letter in which I appealed to Members of the National Association and to all others interested in its work "to join me in making some special effort to commemorate Her Majesty, the Qeen-Empress' Jubilee and at the same time to benefit those Indian women in whose welfare the Queen takes so great and personal an interest."

It is unnecessary for me to repeat the arrangements made to carry out this suggestion; but now that the collection is closed, I shall be glad if you will allow me, through the columns of your paper, to inform those who interested themselves in the matter, of the success of the effort made, and to give a few particulars with regard to the sums collected. On the 15th of october, on which day we were obliged to close the list of "Jubilee" subscriptions and donations, we had received Rs. 4,78,465 in India; and £1,770 in England. Our Jubilee collection therefore exceeds five lakhs.

Of this sum 3½ lakhs were received in large donations the remainder being the aggregate of smaller subscriptions on cards. Most of the Branches of the Association took an active part in this collection, and Rs. 72,925 has been paid over to them according to the rules laid down in my letter of the 1st of January.

To all donors of large sums and to the collectors of smaller ones I have sent receipts, and I have therefore, in some way, been able to acknowledge their kindness, and to express my appreciation of their generosity. I have, however, still to thank the tens of thousands of persons whose subscsriptions, ranging from one anna to Rs. 100, have so greatly swelled this Jubilee collection, and whose gifts, appearing on other people's cards, have as yet received no personal recognition. I take this opportunity of doing so most heartily.

The list of donors and collectors is now being prepared for transmission to the Queen-Empress, and the same list with the address forwarded to Her Majesty, will, for the information of subscribers, be published in the Report of the National Association in January 1888. And here I must add that although this letter refers only to the "Jubliee collection" and to the money which has actually passed through my hands, it would be incomplete did it not contain at least a passing allusion to the well-directed efforts and to the large sums which are being spent in various parts of India, upon Female Hospitals, and other works in connection with the National Association, and in commemoration of the Queen-Empress' Jubilee. Her Majesty's attention will be drawn to these, and detailed accounts of them will also appear in the Annual Report.

The system of collection by cards inauguarated on this occasion has certainly been successful. It has proved that vast numbers of persons are interesting themselves in the work of the Association, and it has shown that by a very simple organization, a lakh and a half can be collected in small sums such as thousands of persons are both able and willing to give. I hope therefore to continue it for the benefit of the Central Fund, though I cannot after this year undertake to receive money for the Branches.

The Central Committee have now been able to invest the five lakhs which they were anxious to lay by as an Endowment Fund. The Branches are likewise endeavouring to invest money so as to ensure the continuity of the work of the National Association. We trust therefore that although the next year affords no special occasion for liberality, the progress already made in carrying out the objects of the Association, and the assurance of stability given to it by the possession of a certian, though a comparatively small income, will encourage all who are interested in the welfare of the women of India to make still further efforts on their behalf, and give us the means of more quickly relieving their sufferings and of supplying them with the medical aid which they so greatly need.

I am, Sir,
Yours faithfully,
[ Sd. ) HARRIOT DUFFERIN,
LADY PRESIDENT,
*National Association for supplying Female Medical Aid to the Women of India.*

## A PAPER SUPPRESSED.

The 'Deccan Times' informs us that H. H. the Nizam has thought fit to suppress one of the vernacular papers called 'Akbar Assafia' for speaking disrespectfully about the offer of the Nizam of 60 lacs to the Government of India. The particulars of the offence of the newspaper editor are not known: but the fact shows one thing very clearly. The existance of a Paper in a Native State clearly depends upon the whims of the Chief. We are thankful to cur own Government here that the papers here do not stand on such a slippery basis. Healthy criticism of the ddings of Government officers is needed in British India and especilly so in a Native State; and the Government which can afford to suppress a paper for an incident like the above can never expect to find sound advice. The wholesome effect of free criticism cannot reach Government. Evidently the Nizam's Government hardly appreciate, it would appear, the value of genuine criticism of public Journalists; and it seems extremely incongruous to find the liberality of the offer and narrow-mindedness shown in the suppression of the paper, in the same authority. Is there any hope for reconsidering the order of suppression?

## THE EDUCATIONAL CONFERENCE.

The Berar Educational Conference held its sittings this year at Amraoti. It commenced its work on 9th instant and finished it on 12th. The Director of Public Instruction made an opening speech on 9th. We publish a summarized account of the work of the Congress this year in our Marathi columns. Some essays were read and some lectures were delivered by School masters. The essayists claimed, we believe, no originality of thought but only attempted to give the thoughts of better minds for the benefit of those that have no access to them. Such attempts are not to be deprecated but if the essays were written and lectures given in Marathi, the sphere of utility would undoubtedly be increased. It is a mistake to suppose that reading an essay or delivering a lecture at the Conference would bring the essayist or lecturer any benefit by way of promotion. The same must be said of class teachings. No teacher teaches his classes in School, as he means to make appear, he does. It is absurd to suppose that whole year's teaching could by any human method be compressed into an hour's business; and this is what the Masters who teach a class be fore the Conference try to do. Both these are defects which could be easily cured next year.

We publish *in extenso* the remarks of Mr. Crawley-Boevy, Chief Presidency Magistrate of Bombay. It will show to our people here in Berar what the Magistrates think of their own position in the Bombay Presidecy. It will also show to the Local Magistracy the independence of the Magesterial bench which would be worth taking a lesson from.

"I consider that the diginity ofmy office requires me to repudiate with indignation from the bench the improper and wholly unwarrantable charge which Sir Frank Souter, Kt., C. S. I.,f and C. I. E, has thought it consistent with his duty publicly to make against me, I have yet to learn that I as Chief Presidency Magistrate, am responsible to the Commissioner of Police for my magisterial decisions, or that he has any authority or right whatever to call me to account or to comment publicly on my judicial preceedings. This is neither the place nor the time to give any explanation or justification of the order passed. I shall be prepared, if necessary, to give ample justification to any competent authority that may call my decision in question, but the following facts may be stated for public information: The newspaper report is incomplete, and only partially correct. The sensational heading, which seems to have, irritated Sir Frank Souter, represents the reporter's view of the whole case. Had he reported the case more fully, and especially had he given the first question and answer, the heading would have been more intelligible. But incomplete though the report is, I feel bound, in fairness to the reporter, to say that there was, in my opinion, some *prima facie* justification for the heading which was inserted. The reporter was present and heard the whole case. Sir Frank Souter was not present The accused was charged by me. When the case was enquired into one European police officer only was in Court. He was a constable of the Water division, know nothing of the circumstances under which the case had been sent up, and did not open his mouth. The case was decided on the sworn testimony of the native police constable in charge, and I have yet to learn that an absent police officer, however high his rank, is a better judge of the merits of a case than the trying magistrate. Lord Denman, Chief Justice of England, has laid down that the magistrate is the proper judge of the conduct of the police in cases coming before him, and is bound to pronounce thereupon whenever occasion occurs. This is, I believe, the view which has always hitherto been taken by the high authorities both in England and in India, and I am not aware that the city of Bombay is any exception to this very salutary rule. Had I commented upon this case, as I might havve done, I should have been entirely within my right as a magistrate. I did, however, dismiss the charge without comment at all; and had not an intelligent newspaper reporter been present, and given his own independent view, no more would probably have been heard of the case. It is entirely withont precedent, in my magisterial experience, for any police officer, however high his rank, to attack a magistrate openly in the columns of the daily press. I cannot but think that a bad example of this kind by an officer of the rank of police Commssioner is not unlikely to have a pernicious and demoralizing effect upon police subordinates of all ranks. For this cause I deeply regret it. Buf as long as I may have the honour to hold a seat on the Police Bench I shall not hesitate, by all legitimate means in my power to assert the dignity, of my office, and the judicial independence of myself and my colleges."

पोंच:—"कैवारी" याचें पत्र पावलें. पत्र उशिरानें आल्या मुळें व स्थल संकोचा मुळें या अंकीं घेतां आले नाहीं. पुढील अंकीं घेऊं

## वऱ्हाड.

हवामानः—मधून मधून ढग येतात. ज्यांन उष्णता आहे. तापाचा आजार [illegible]षण कआहेच.

मे. कर्नल मेकंझी साहेब, एलिचपूरचे डिपुटी कमिशनर हे रजेवरून परत येऊन आपले कामीं रुजू झाले; व मे० क्यापटन मारीस साहेब लवकरच खामगावास आपल्या जागीं परत येतील.

मि० स्टान्लीमेर एकस्ट्रा असि० रेसिडेंट हैद्राबाद यास निजाम सरकाराकडे १००० रु० ची जागा मिळणार, त्यांचे जागीं मि० वेड कमिशनर साहेबांच्या आफिसचे सुपरिंटेंडेंट हे जाणार; मि० जोन्स आपले पुर्वीचे जागीं वऱ्हाडात परत येणार आणि मि० स्टान्ली मेर हैद्राबादेस त्यांचे जागीं जाणार असें म्हणतात.

शेगावचे स्पशेल माजिस्त्रेटचे कोर्ट बरेच दिवस बंद होते ते आतां लवकरच पुन्हा सुरू होणार.

## वर्तमानसार.

युरोपांतील कांहीं बादशहांचे पगार खाली दिल्याप्रमाणें आहेत. रशियाच्या झारास ४१,२५,००० रु० टर्कीचे सुलतान यांस, ३०,००,००० रु०; आस्ट्रियाचे बादशहा यांस २०,००,००० रु०; प्रशियाचे राजे यांस ३५,००,००० रु०; किंग हेबर्ट यांस यांस, १२,००,००० रु० क्वीन व्हिक्टोरिया यांस, ११,००,००० रु०; स्पेनच्या राणीस ९,००,००० रु०; बेलजियमच्या राजास २,००,००० व प्रेसिडेंट ऑव लंड आफ अमेरिका यांस २५,००० रु० या प्रमाणें रकमा खर्च होतात.

कपुर तळ्याच्या महाराजांनीं हिंदुस्थान सरकारांस पांच लक्ष रुपये देण्याचें कबूल केलें आहे.

साहामाही ,, ३ ,, ०८
साल अखेर ,, ७ ,, १०१८
फिरकोळ अंकास ....................०४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु. १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस.........०१

Per annum in arrears 7 ,, 1R. 8
Six monthly ............ 3 ,, 8
Single copy ................................ 4

Advertisements.
Below 10 lines...
Per line over 10...4a
Repetition per line 3a

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.

VOL. XXI. AKOLA MONDAY 21 NOVEMBER 1887. NO 45.
वर्ष २१ अकोला सोमवार तारीख २१ माहे नोवेंबर सन १८८७ इ० अंक ४५.

## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

उमरावती ता० १२।११।८७.

रा. रा. वऱ्हाड समाचार कर्ते यांसः—

वि. वि. आपण आपले सुंदर पत्राचे येत्या अंकीं दोनचार ओळीस जागा द्याल ही अशा धरून आपले भेटीस आलों आहे. अझून यांची खोड जात नाहीं:- स्टेशनावर जे टिकिट कलेक्टर असतात त्यांचे जुलुमावडे अझून चांगलें लक्ष्य पुरविणारा कोणी नाहीं कायहो? काल मी सहज कांहीं खासगी कामा करतां बडनेऱ्याचे स्टेशनावर गेलों. तेव्हां गाडींतून उतरण्याचे वेळेस मी मजा पाहिली कीं तेथील टिकिट कलेक्टर उतारु लोकांचें टिकिट घेऊन त्यांना प्रसादा करितां म्हणून एक गचांडी देऊन पुढें लोटीत होता. हे कलेक्टर यौवनदशेतले व गाजरतोंडे असल्यामुळेंच मला वाटतें त्यांना ही मस्ती आली असावी गरीब बिचारे 'थर्डक्लासचे प्यासेंजर्स' त्यांना साहेब म्हणजे मोठा बाऊ वाटतो! असो. ही मजा झाल्यावर नागपुरास जाण्या करितां बडनेऱ्यास जी २॥वाजतां गाडी येते त्या वेळेस उतारु लोक टिकिट घेऊन फाटकापाशीं तयार होते पुढें वरचेंच हत्ती प्रमाणें मस्त झालेले व मदिरापानानें गुंग झालेले व झोकांत आलेले कलेक्टर साहेब फाटकापाशीं तिकिटें तपासण्या साठीं आले. व टिकिटे तपासणीचे वेळीं लोक गर्दी करून नेहेमीं प्रमाणें गाडी चुकेल या भीतीनें फाटका बाहेर येऊं लागले व या साहेबांनीं फाटकाचें दार इकडून तिकडे जोरानें हलविलें. त्यामुळें कित्येक पडले, कित्येक चेंगरले. व त्यामध्यें एक संभावीत बाई होती. तिचे तिकिट तपासणीचे वेळीं कांहीं वेडेचार केले. बाई फार संतापली. पण करते काय बिचारी!! साहेबका धाक बडा!

असा अनाचार पाहून माझी आग मस्तकास गेली; व मी त्या दुष्टाला विचारले कीं साहेब हे आपण काय करतां? त्यावर त्या सोद्यानें उत्तर दिलें "ये बडे बदमास लोक है! सुनते नही. इसवास्ते उनका बंदोबस्त करतांहूं." पुन्हां मी साहेबांस विचारले "साहेब ती बाई सुद्धां बदमास होती काय? म्हणूनच तुम्ही असा प्रकार केलात?" त्यावर उत्तर काय देतो! पत्रकर्तेराव! तुम्हांला हें प्रशस्त दिसतें काय? अहो बंदोबस्त करावयाचा होता तर स्टेशनकरतां पोलिस शिपाई लोकांची तोंडें पहाण्याकरितां दिले आहेत काय? यावरून या लठ्ठ निरंजनालाच बदमासपणा करण्याची हौस आहे असें दिसत नाहीं काय? बरें पुन्हा बदमासपणा करून सवरून उतारूनां बदमास ह्मणतो हें नवल नव्हे काय? गाडी जाईल या भीतीनें फाटकापाशीं कोणी गर्दी करणार नाहीं काय? यांचे देशांत अशी चाल नसेल काय? खरोखर असेलच. मग यानें जो हा अपशब्द उच्चारला यांत कांहीं तरी तथ्य आहे काय! काय भोळसरपणा आहे हा! हे उतारू बदमास.—हे त्याचे तोंडचें शब्द!!! — व हा मोठा साव नाहीं! बरें लोक घटकाभर बदमास होते कबूल. पण त्या बाईशीं गुस्ताखीपणा करण्याचें याचें काय नडलें होतें. बाबानें! तुमचे स्त्रिया प्रमाणें आमचे इकडे पाहिजे त्याचे स्त्रीस बगींत घालून हवा खाण्यास व तिला चारण्यास नेत नसतात हें पक्कें ध्यानांत असूं द्या!

पत्र कर्ते राव असले लठ्ठनिरंजन व यौवनानें उन्मत्त झालेले कां या रेलवे कंपनीला नोकर मिळतात? यांना पैसा देऊन लोकांना त्रास देणें करितां कां कंपनी नोकर ठेवते? असें असेल तर कंपनीनें कृपा करून असले सोरट ठेवूं नयेत अशी आशा करतों. असो एडिटर साहेब विस्तार फार झाला! क्षमा असावी! नमस्कार!

आपला
" कैवारी. "

वऱ्हाडसमाचार.

मिती मार्गशीर्ष शुद्ध ७ शके १८०९

## वऱ्हाड वक्तृत्वोत्तेजक सभेचा वार्षिक समारंभ.

वऱ्हाडांतील वक्तृत्वोत्तेजक सभेचा येता वार्षिक समारंभ नाताळच्या सुट्टींत भरण्या विषयीं सेक्रेटरीच्या सह्यांच्या जाहिराती प्रसिद्ध झाल्या आहेत. विषयांची निवडही प्रसिद्ध झाली आहे. विषय कोणकोणते निवडले जावे या विषयीं सूचना करण्या विषयींचीं विनंती पत्रें अगोदरच जागोजाग पाठविण्यांत आलीं होतीं. या रीतीनें विषयाच्या निवडी बद्दल लोकांच्या सूचना बोलावून त्यांचा विचार करून नंतर विषय कायम करणें हें खरोखर चांगलें आहे. या योगानें निरनिराळ्या उपयुक्त सूचना जागोजागहून येतात व त्यापासून कामाचा फायदा होण्याचा संभव असतो. फक्त उमरावती येथील व्यवस्थापकांचो सभा भरून त्यांच्याच सूचनेप्रमाणें विषय नेमणें ह्मणजे गांवोगांवच्या सभ्य व विद्वान् लोकांकडून वर्गणी येत असतांही या कामीं त्यांचा विचार मुळींच न घेण्या सारखे आहे. या लोकांची सभेला जर यथाशक्ति मदत होत असते तर त्यांची इच्छा अमुक अमुक विषयांवर भाषणें ऐकण्याची असल्यास तिजकडे लक्ष्य द्यावें हें बरें. आतां अशा प्रत्येक मनुष्याच्या सूचनेकडे लक्ष्य देऊन त्याप्रमाणें विषय नेमणें असंभव्य होणार आहे खरें तरी त्यांनीं सुचविलेले विषय खरोखरच ग्राह्य असतीलतर ते निवडले जाण्यास मुळींच हरकत होत नाहीं. असो. गुदस्ताच्या समारंभास बाहेर गांवची वर्गणी बरीच जमली होती व यंदाही सेक्रेटरींच्या सह्यांची विनंती पत्रें जागोजागच्या एजंटा कडे गेलीं आहेत तेव्हां त्यांपासून कांहीं तरी फायदा होईलच. आमच्या वऱ्हाडांतील सर्व सुखवस्तु देशोन्नति इच्छिणाऱ्या सभ्य गृहस्थांनीं या कामीं होईल तितकी मदत हस्ते परहस्ते करावी हें त्यांस भूषणास्पद होणार आहे. आपल्या प्रांतांतील ही सभा आज एकसारखी १५ वर्षें चांगली चालून तिचा प्रती वर्षी उत्कर्ष होत आहे हें पाहून कोणासही आनंद झाल्या वांचून रहाणार नाहीं.

यंदा जे विषय पसंत होऊन ठरविले आहेत ते तीनही चांगले आहेत. तीनही विषय सामाजिकस्थिति संबंधाचे आहेत. पहिला विषय पुराण मित्येवन साधु सर्वं न चापि सर्वं नव मित्यवद्यं ॥ संतः परीक्ष्यान्य तरद्भजन्ते" इ० या कालिदासोक्तीवर आहे. दुसरा जातिभेदा संबंधानें, व तिसरा आपल्या लोकांत लग्न संबंधानें होणाऱ्या अवाढव्य खर्चावर आहे. यापैकीं शेवटल्या दोन विषयांवर आज पर्यंत जागोजाग बऱ्याच चर्चा झालेल्या आहेत व पहिला विषयही अंशतः वक्त्यांच्या संभाषणांतून पुष्कळ वेळां आलेला आहे. विवाहसंबंधीं खर्चाबद्दल मुंबई इलाख्यांत लोकांनीं गांवोगांवीं एक मत करून कांहीं निर्बंध केल्याचें आमच्या ऐकण्यांत आहे. आमच्या वऱ्हाडांत असें कोठें ऐकण्यांत आलें नाहीं. अनायासां वक्तृत्वसभेच्या योगानें हा विषय पुढें आला आहे तेव्हां त्या संबंधानें कायमचा कांहीं तरी विचार होईल तर बरें. आमच्या मतें विवाह काळ हा विषय जन समाजाला जितका महत्वाचा आहे तितकाच हा विषय आहे. आपल्या सार्वजनिक सभेचा वाढ दिवस याच सुमारास येतो. या दिवसाबद्दल कांहीं उत्सव करण्यांत आला तर प्रांतांतून पुढारी ह्मणविणारी बहुतेक मंडळी उमरावतीस जमण्याचा संभव आहे; त्या वेळीं या विषयाचा विचार विवाहकालाविषयीं ज्या प्रमाणें झाला त्या प्रमाणेंच व्हावा अशी आमची सूचना आहे. याविषयीं अज्ञानपणाच्या समजुती मुळें आजपर्यंत हजारों कुंटुंबें सधन असतां हल्लीं धुळीस मिळालेलीं आहेत.

यंदा राजकीय विषयांपैकीं मुळींच नेमिला गेला नाहीं. आम्हांला वाटतें एखादा विषय असा असतां तर बरें होतें. तीनही विषय सामाजिक स्थिति संबंधाचे असल्या कारणानें श्रोत्यांस कांहींसें कंटाळवाणें वाटण्याचा संभव आहे शिवाय आमच्या लोकांस सामाजिक सुधारणेची मूलतत्वें ज्या प्रमाणें समजलीं पाहिजेत त्याचप्रमाणें राजकीय विषयांचीं तत्वेंही समजूं लागलीं पहिजेत.

हल्लींचा काळच असा येत चालला आहे. असो. शिवाय यंदा तुकारामबोवा किंवा ज्ञानोबा यांच्या कवितेंतून एखादा चरण घेऊन त्यावर कीर्तन करण्यास विषय नेमिला नाहीं हें एकपरी चांगलेंच आहे. कांहीं दिवसांपूर्वीं आमच्या पत्रांतून एका गृहस्थानें या बद्दल सूचना केली होती तिकडे व्यवस्थापकाचें लक्ष्य गेलें आहे असें दिसतें त्या प्रमाणेंच या गृहस्थानें आयत्या वेळचा विषय मुळींच नसण्या बद्दल सूचना केली होती. तो विषय यंदा मुळींच दिसत नाहीं.

सभेच्या नियमांबद्दल फारसें लिहिण्या सारखें नाहीं. उमेदवारांस लागूं असणाऱ्या गुदस्ताच्या नियमांत यंदा बदल केला आहे. गुदस्ता कांहीं चांगलीं भाषणें ऐकण्यांत यावीं या हेतूनें जुन्या उमेदवारांसही भाषण करण्याची परवानगी होती. परंतु यंदा ज्यांना २ बक्षिसें मिळालीं आहेत त्यांना भाषण करण्याची परवानगी नाहीं. या नियमानें यं[illegible] मि० खरे वगैरे आपल्या परिचयातील उमेदवारांचीं भाषणें ऐकण्यास मिळणार नाहींत हा नियम एकापरी चांगलाच आहे. या सभेचा मुख्य उद्देश आपल्या लोकांत वक्तृत्व[illegible]क्ति वाढवी व तिला उत्तेजन यावें असा आ[illegible]

एकदा जो वक्ता चांगला ठरला त्याला पुनः पुनः बक्षिसें दिल्या कारणानें नवीन तरुण उमेदवारांस उत्तेजन न मिळतां त्यां[चे] प्रयत्न जागच्या जागींच विरतात. या नियमानें यंदा अशा उमेदवारांस अगोदर उत्तेजन मिळणार आहे. त्या प्रमाणेंच गुदस्ता एकाच उमेदवारास पाहिजे तितक्या विषयांवर भाषण करण्याची परवानगी होती यंदा ती नाहीं. एकाच उमेदवारानें एकाच विषयावर चांगली तयारी केली असतां तो विषय त्याकडून चांगल्या रीतीनें प्रतिपादित होण्याचा संभव आहे. पण हेंच त्यांचें लक्ष्य अनेक विषयांकडे गेलें ह्मणजे सर्व विषय चांगले उ[तरविण्यास] कठीण पडणार आहे. तेव्हां हा नियम बरा आहे असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं.

आमच्या व्यवस्थापकांनीं यंदा दुसरी एक नवीन टूम काढिली आहे. आजपर्यंत सभेच्या समारंभास कुलीन स्त्रियांस बसण्याची सोय नसल्यामुळें या समारंभाचा फायदा आमच्या स्त्रियांस मुळींच मिळत नसे. यंदा व्यवस्थापकांनीं ही अडचण दूर करून त्यांना बसण्याकरितां पडदपोशीची जागा देण्याबद्दल वचन दिलें आहे. ही गोष्ट चांगली आहे व तींत कोणत्याही प्रकारें व्यत्यय न येतां ती शेवटास गेली तर आमच्या व्यवस्थापकांना मोठें भूषणप्रद [illegible] आहे. आमच्या स्त्रीजनांना सामाजिक

स्थितींत हें एक पाऊल पुढेंच पडलें असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. आमच्या पुढारी मंडळी ख्रिजनांच्या फायद्यासाठीं एक एक अशा तजविजी करतील तर परदेशीय लोक या संबधानें आपल्याला जीं दूषणें देत असतात त्यांला जागा मुळींच रहाणार नाहीं. लोक कांहीं म्हणोत, ह्या व अशा सारख्याच अन्य प्रसंगीं स्त्रियांची मर्यादा व पडदपोशी योग्य रीतीनें राहून जर त्यांची सोय होत आहे तर त्यांना अशा प्रसंगीं येण्यास कांहीं रकत नाहीं. असो.

शेवटीं आमच्या व्यवस्थापकांस सांगणें एवढेंच आहे कीं गुदस्त सालीं समारंभाच्या वेळीं कांहीं मंडळींनीं जो कडकपणा व अविचारीपणा दाखविला तसें यंदा न होऊं देण्याबद्दल त्यांनीं चांगली तजवीज ठेवा. अशा वर्तनानें लोकांचा ग्रह वाईट होऊ सभेच्या सर्व प्रयत्नांवर विरजण पडण्याचा भव आहे. या करितां इकडे अवश्य लक्ष लें पाहिजे. आमची मंडळी असा प्रसंग येआणणार नाहीं अशी आमची पूर्ण आ आहे.

## शिक्षक समाज.

(मागील अंकावरून पुढें चालू.)

दोनप्रहरीं दोन वाजल्या नंतर पुन्हां कामाची सुरूवात झाली. प्रथमतः रा. रा. हरी चंद्र रोहणखडकर यांनीं "इतिहास" विषयावर फार सुरस व मनोवेधक व्याने इंग्रजींत दिलें. भाषासरणी फार सुरे होती. त्यांनीं इतिहास ह्या शब्दाची व्या देऊन ऐतिहासिक ग्रंथ असावेत वसे प्रतिपादन केलें. इतिहास लिहिण्यास णत्या गोष्टी अवश्य आहेत व इतिहासा अध्ययनापासून व्यक्तीस व राष्ट्रास माजिक, व राजकीय संबधानें काय फायदे हे सांगितलें. नंतर ऐतिहासिक ग्रंथ हिण्या करितां राजानें कोणत्या रितीनें उ द्यावें याचें ही थोडेंसें दिग्दर्शन केलें. रींत विषयाचें निरूपण फार उत्तम रि झालें. व्याख्यान आटोपल्यानंतर कळंब हेडमास्तर रा. रा. गोविंद जनार्दन यांनीं वये इयत्तेच्या मुलांस इतिहास शिकवून दाविला. नंतर मि. अनासखा यांनीं पांचवे इयत्तेच्या मुलांस ऊर्दु भाषेत कविता शिकवून खविल्या. सदहु गृहस्थांचें शिक्षण बाकीया सर्व शिक्षकांपेक्षां अधिक चांगलें लें. ह्यांची शिकविण्याची शैली फार चांगअसून विषय मुलांच्या मनांत बिंबवून चें कामही यांनीं फार चांगलें केलें.

शुक्रवारीं सकाळीं ११ वाजतां उमरावती ा. स्कु. से. अ. मा. रा. रा. रामभाऊ पन्हाळकर यांनीं "प्रवाही पदार्थांचे धर्म" ह्या विषयावर सप्रयोग व्याख्यान इंग्रजींत दिलें. व्याख्यानकारांनीं प्रवाही पदार्थांचे मुख्य मुख्य धर्म सांगून त्या धर्मान्वयें व्यवहारोपयुक्त पुष्कळ गोष्टींचें विवेचन केलें. शेवटीं वाार्कषक यंत्रावें कांहीं प्रयोग करून दाखवून व्याख्यान संपविलें. तदनंतर आकोला हा. स्कु. चे फोर्थ अ. मा. रा. रा. चिंतामण गशा पांडे यांनीं "मानसिक शिक्षण" या विषयावर फार मनोवेधक व बोधपर भाषण जींत केलें. विषयाची जुळणी चांगली होती. व्याख्यानकारांनीं प्रथमतः मानसिक शिक्षणाची अवश्यकता फार आहे ह्याचें प्रतिपादन करून तें चांगलें रीतीनें देण्यास अवलोकन, अवधान, स्मृति, विचारशक्ति आणि कल्पनाशक्ति ह्या गोष्टींकडे फार लक्ष दिलें पाहिजे हें सांगितलें. दोन वाजतां हावर्डकृत दुसरे व तिसरे इंग्रजी बुका ऐवजी ६ व्या इयत्तेस रायलरीडर्स नं० ३ चें पुस्तक सुरुं करावें किंवा नकरावें ह्या संबधानें बरीच चर्चा होऊन सर्वानुमतें रायल रीडर नं० ३ हें पुस्तक चालू करावें असें ठरलें. त्या नंतर ज्या ज्या ठिकाणीं रात्रिच्या शाळा मास्तरलोकांच्या श्रमानें स्थापन झाल्या आहेत त्यांची सांप्रतची स्थिति कशी आहे ह्या विषयीं कित्येक अनुभविक शिक्षकांनीं आपापले अनुभव समाजापुढें ठेवले. विषयाची बरीच चर्चा झाल्यानंतर सर्वानुमतें अशा प्रकारच्या शाळांस उत्तेजनार्थ पुढील वर्षांकरितां ४० रुपये देण्याचें ठरलें ही फारच अभिनंदनीय गोष्ट आहे. निकृष्टावस्थेंतील लोकांना विद्यामृताचे प्राशन निरपेक्ष बुद्धीनें ज्या शिक्षक लोकांकडून दिलें जातें आहे त्यांचे प्रयत्न खरोखर फारच स्तुत्य आहेत व त्या प्रमाणेंच इतर शिक्षकांकडून ही असेच प्रयत्न व्हावेत अशी आमची उमेद आहे. या नंतर उमरावती आं. व्ह. स्कू. हेड मास्तर रा. रा. श्रीधर रामचंद्र पिंपळखरे यांनीं मराठी भाषेची सांप्रतची स्थिति व ती सुधारण्यास शिक्षक मंडळीनें कोणते उपाय योजिले पाहिजेत" या विषयावर फार उत्तम निबंध लिहिला होता. निबंधाची भाषा फार चांगली होती व त्यांनीं सुचविलेले उपायही आचरण सर्वथैव घेण्यासारखे आहेत.

शनवारी प्रातःकाळीं सहा वाजतां समाजाचें काम सुरू झालें, शाळां मध्यें शारीर शिक्षण मिळण्याची फार अवश्यकता आहे असें कित्येकांनीं सुचविल्यानंतर ज्या शाळांस कसरती मास्तराचा उपयोग करून घेतां येत नाहीं त्या शाळांत एतद्देशीय खेळ सुरू करावेत असें सर्वांनुमतें ठरलें. यानंतर पुढील वर्षा करितां अध्यक्ष व सेक्रेटरी त्यांची निवडणूक होऊन मागील वर्षांचेच कायम झाले. नंतर पुष्कळ शिक्षकांनीं किरकोळ सूचना केल्या. त्या संबंधानें कांहीं वेळ वाटाघाट होऊन नंतर अध्यक्षांनीं चटकदार भाषण करून समाजाचें विसर्जन केलें.—दोनप्रहरीं उमरावती हा. फ. अ. मा. रा, रा. लक्ष्मण कृष्ण चिपळूणकर यांनीं (Physical Geography) या संबधानें फार मनोरंजक भाषण केलें अशा प्रकारच्या शास्त्रीय विषयाच्या उपयुक्तते विषयीं जितकें लिहावें तेवढें थोडकेंच. नंतर मे. डायरेक्टर साहेब आल्यानंतर इन्स्पेक्टर मंडळीच्या व शिक्षक समाजाच्या व शिक्षक समाजाच्या सेक्रेटरींनीं आपापल्या कामाचे रिपोर्ट वाचले शेवटी मे. डायरेक्टर साहेब यांचें भाषण होऊन सभा विसर्जन झाली. मे० डायरेक्टर साहेबांचे भाषण फारच मुद्देसूद असून चित्तवेधक झालें. त्यांनीं भाषणांत पुष्कळ गोष्टींचा उल्लेख केला. व त्यां संबंधानें त्यांचे सर्व विचार सर्व शिक्षक लोकांनीं घेण्यासारखे आहेत. शाळांमध्यें नीतिशिक्षण यासंबंधाचे त्यांचे विचार फार सुरेख असून लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. त्यांचें त्या विषयींचे विचार आम्हीं पुढील अंकांत देऊ.

## शिल्पकला विज्ञान.

शिल्पकला विज्ञान ह्या नांवाचें एक मासिक पुस्तक आमच्याकडे, अभिप्राया करितां आलें आहे, त्याचा आह्मी आदरपूर्वक स्वीकार करितों. ह्या पुस्तकाचे प्रकाशक रा. रा. महादेव बल्लाळ नामजोशी हे आहेत. रा० रा० नामजोशी ह्यांनीं कांहीं दिवस किरण या नांवाचें एक सप्ताहिक इंग्रजी; वर्तमानपत्र काढिलें होतें, परंतु त्या पत्राच्या मंद पुण्यते मुळें ह्मणा अगर वाचकांच्या भाग्यहीनतेमुळें ह्मणा तें पत्र लवकरच स्मृति विषयतेस प्राप्त झालें. प्रत्येक वर्तमानपत्राची किंवा मासिक पुस्तकाची चिरायुष्यता प्रकाशकाच्या दृढ निश्चयावर सर्वथैव अवलंबून असते. सबब सदहू मासिक पुस्तक दीर्घ काळ स्थाई होईल अशा विषयीं रा० रा० नामजोशी खबरदारी घेतील अशी आम्हीं आशा करितों. अशा प्रकारच्या मासिक पुस्तकाच्या उपयुक्तते विषयीं जितकें लिहावें तेवढें थोडेंच आहे. नैसर्गिक साधनांची हिंदुस्थान देशांत अत्यंत विपुलता आहे ही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे. एतद्देशीय लोकही बुद्धिमत्तेच्या संबंधानें युरोपांतील मुख्य राष्ट्रांशीं बरोबरी करूं शकतात. असें असतांही हिंदुस्थान देश युरोपांतील बहुतेक राष्ट्रांपेक्षां फार निर्धन व निकृष्ट आहे. ह्या स्थितीची तत्ववेत्यांनीं पुष्कळ कारणें शोधून काढिलीं आहेत. त्यांपैकीं एक मुख्य कारण शास्त्रीय व यांत्रिक शिक्षणाचा अभाव हें होय. बाराव्या, तेराव्या, आणि चवदाव्या शतकांत इंग्लंद देशही हिंदुस्थान देश प्रमाणेंच निकृष्टावस्थेंत होता. परंतु बेकन प्रभृति नामांकित तत्ववेत्यांनीं स्वदेशाच्या व्याधि ग्रस्ततेची पूर्ण चिकित्सा करून ती दूर करण्या करितां पदार्थ विज्ञान, यांत्रिक शिक्षण वगैरे सबळ उपाय योजिले त्यामुळें इंग्लंद देश उत्तरोत्तर ऊर्जित दशेस येऊं लागला. चोहोंकडे कलाकौशल्याची अभिवृद्धि झाली. व्यापार धंदे व कारखाने वाढत चालले. कामकरी लोकांची मजुरी वाढत चालली. देशाचें भांडवल वाढलें. गेल्या तीन शतकांत इंग्लंद देश इतका ऊर्जित व संपन्न दशेस आला आहे कीं सर्व पृथ्वीमध्यें त्या देशाची बरोबरी करण्यास एकही राष्ट्र सांपडणें कठीण आहे. ज्या उपायांनीं त्या देशाच्या व्याधींचें निरसन झालें तेच उपाय हिंदुस्थानच्या सांप्रतच्या विपत्तीस दूर करतील यांत कांहीं संशय नाहीं.

आतां शास्त्रीय शिक्षण व यांत्रिकज्ञान याची सुरवात हिंदुस्थानांत कशी करावी ह्या विषयीं चळवळ चोहोंकडे सुरुं आहे. परंतु फंडाची कमताई असल्यामुळें सकारास यांत्रिक ज्ञानाचें शिक्षण शाळांत सुरुं करितां येत नाहीं लोक अकिंचन असल्यामुळें त्यांच्या कडून जितकी खटपट व्हावी तितकी होत नाहीं ही मोठी दिलगिरीची गोष्ट आहे. परंतु अलीकडे मासिक पुस्तकद्वारां व वर्तमानद्वारां शास्त्रीय व यांत्रिक ज्ञानाच्या प्रसाराविषयीं कांहीं प्रयत्न चालले आहेत. ही फार अभिनंदनीय गोष्ट आहे. अशा प्रकारचीं दोन तीन यांत्रिक पुस्तकें निघालीं आहेत. त्यांपैकीं शिल्पकलाविज्ञान हें एक होय. ह्या पुस्तकांत फार उपयुक्त विषयांचें विवेचन केलें आहे.

पहिला विषयः— प्रस्तुत प्रयत्नाची अवश्यकता व हेतु हा आहे. ह्यासंबंधानें प्रकाशकांनीं आपले जे विचार प्रदर्शित केलें आहेत ते खरोखर ग्राह्य आहेत यांत बिलकूल संशय नाहीं.

---

The Berar Somachar

MONDAY NOVEMBER 21, 1887

## THE DEATH OF MR DESAI AT SURAT.

The death of Mr. Desai who studied in England and was called to the Bar there, suggests a subject for serious reflection. Hardly anybody knew Mr. Desai on this side of India; he was a rising young man of more than average abilities. He was one of those that had suffered much as a member of the caste to which he belonged, on account of his stay in England. That rising young men like Mr Desai 'so full of future promise, should fall away in the prime of their life brings to mind a most important national problem, which no thinking person can ignore. Is the strain our boys are subject to, too much for their health? Is there any inherent defect in the system of education imparted to our youths here, or do our youths suffer equally with their comrades in European schools and Colleges? We yearly send a batch of students for the College Entrance Examination from Berar after undergoing a schooling for at least a dozen years. Some of our boys join the different Colleges too after they pass the Matriculation. We are therefore as much interested in looking carefully to the results upon the health of our boys of that schooling and that stay at the Colleges as people elsewhere.

For the most obvious physical reasons the intellectual as well as the physical development cannot reach their utmost limits in one and the same individual. Thinking brains must always consume a greater amount of blood—supply than quiescent ones, and this is how a strong intellect in a strong frame is a rarity in the world. The cultivation of the intellect may thus be said to be in direct antagonistic to the cultivation of the body. But this is a general reason affecting educated classes in all countries and is not sufficient to justify a particular want of health in Indian boys. One reason that prominently suggests itself to notice, accounts, we believe in a great degree the ill-health and the consumptive tendencies of our educated youths. Our boys have to study all their subjects through the medium of English an utterly foreign language. We do not and cannot learn the subjects in a school or College course through Marathi or any other mother-tongue, just as an English or French school-boy learns his, through English or French. That is a very great disadvantage under which our boys are suffering. We have to learn a language before we learn a subject. Perhaps the best portion of our school and College-life is taken up in studying the [illegible] language; and there is [illegible] energy left in after life t[illegible] what has been acquired [illegible]

Indeed, in ma[illegible] happens that the seeds [illegible] sown at College whic[illegible] yield a rueful fruit. Man[illegible] men

die premature deaths as their constitutions suffer excessively while at School and College. We have no doubt the strain is too great for our youths and the present system of teaching all subjects through the medium of English is, in a great measure answer able for the shortened lives of some of our leading men.

In Berar, as elsewhere in India, education is advancing by rapid strides. Classes like the Brahmans whose vocations were once more or less intellectual, as well as classes that were not particularly known for their intellectual attainments are all running headlong into higher education. Education is undoubtedly a good thing in itself; but it is not to be availed of at the cost of health. If happiness is the goal of individuals let them find a happy medium by getting a moderate proportion of both. It behoves our leading men and the parents of our school-going youths to ponder seriously over the limits to which education in each particular case can be pushed without risking the health of their own children.

Another cause which accounts for the shortened lives of our young men, is the want of regular habits regarding food and exercise, both at school and College. Drilling forms a very noticeable feature of the English schools; boys are regularly used to physical exercise. There is no such thing in our Indian schools; and the matter has not yet sufficiently attracted the attention of the highest authorities. It is a well—known fact that many of our boys have very little exercise and still less at Colleges. The physical exercise which is so much needed simaltaneously with a high mental activity, does not exist This has most pernicious effect on the system.

A third cause is bad company and habits at school and colleges. It is extremely to be regretted that the school course does not provide primarily for the knowledge of a branch of knowledge so very importent to the physical well being of an individual viz physiology. The want of knowledge of this subject coupled with the youthful tendencies so hard to be resisted at that stage of life lead many of our young men to evil ways. This is an evil which is not avowed by many our leading men but, there is no doubt that there will be a decided advantage in knowing and avowing the evil and then trying to suppress it, if possible.

In these days of varied knowledge it is hardly possible for a person claiming to have received a liberal education, to know fewer subjects than are prescribed by the present course. We cannot lessen the subjects; we might perhaps extend the time now taken to study them; but we can certainly remedy the grievances, if we earnestly set to work. A great public boon will have been conferred by devising means to teach the subjects at schools and Colleges through the medium of Marathi. Our boys can be taught regularity of food and exercise and can with a little more vigilance than is at present exercised be led away from evil ways and habits. It is of the utmost consequence to us to save our younger generation; and we can never be too careful in devising some means to save them from untimely deaths.

---

We heartily

Babaji Sahasrabudhe B. A. on his appointment as Head Clerk in the Resident's Berar Office. The Resident has made a very good selection indeed; and we note the authorities in Berar will follow the example. The present policy of appointments to vacant Clerkships without regard to qualifications is certainly productive of many evils. We hear that Mr. Ganpatrao's selection was due to there not being any competent non. Brahmin Head Clerk available in Berar.

---

The undermentioned officers who appeared at the examination held at Amraoti on the 10th, and 12th October 1887 are declared to have passed by the standards and subjects noted below:—

Mr. C. H. Price, Extra Assistant Commissioner passed in all subjects.

Mr. Wamon Narayen Baput, Extra Assistant Commissioner.

Mr. Balkrishna Balwant, Clerk of Court of Small Causes.

Kumar Shree Harbanji Rawaji, Attache to the Resident.

Mr. Manickshaw Rutonji, Extra Assistant Commissioner.

Mr. Ganpat Babaji Sahasrabudhe, B. A. Extra Assistant Commissioner.

Mr. Narayen Pandurang Joshi, Tahsildar.

Messers. Shapurji Virji, and Mir Mubarak Ali, Tahasildars passed in Law, Revenue, and Vernacular.

Mr. Govindraz Moodelliar, Tahsildar passed in Law (Criminal only), Revenue, Accounts' and Vernacular.

Captain J. G. Morris, Assistant Commissioner passed in Vernacular.

Note—This officer having passed his departmental examination ( as notified in Central Provinces Gazette NO. 5534, dated 19th December 1883, ) is now declared to have psssed in all subjects by the Higher Standard.

Lower Standatd.

Captain R. V. Garrett, assistant Commissioner.

Mr. R. MacGill, Extra Assistant Commissioner passed in Law, (Criminal only), Revenue, Accounts, and Vernacular.

Mr. G. Soobrayalu Naidoo, Tahsildar passed in Law (Criminal only), Revenue, Accounts, and Vernacular.

Mr. Vasudeo Vittal Chandekar, Deputy Clerk of Court, Amraoti.

Mr. Krishnaji Mahadeo Clerk of Deputy Commissioner's Court, Amraoti passed in law (Criminal only, ) Revenue, and Accounts.

Note. This officer being exempted from appearing for examination in the Vernacular.

Mr. Raghunath Balwant Clerk of Court, Badnera.

Mr. Wamon Gunesh, Tahsildar, passed in Law and Revenue.

Note. This officer is exempted from appearing for examination in the Vernacular.

Mr. Hyder Ali Khan, Attache to the Resident.

Mr. Mahomed Rahimatulla, Naib Tahsildar.

Mr.P. J. Thoris Deputy Clerk of Court, Akola.

Mr. Ganesh Gopal, Officiating Clerk of Deputy Commissioner's Court, Buldana passed in Law (Criminal only), Revenue, and Accounts.

Note. This officer is exempted from appearing for examination in the Vernacular.

Mr. Laxman Narayen, Clerk of Court, Malkapur.

Mr. Situl Sing, Naib Tahsildar.

Mr. Saifuddin Lalkhan, Clerk of Deputy Commissioner's Court, Wune passed in Law (Criminal only), Revenue, Accounts, and Vernacular.

Mr. F. Ballantine, Officiating Deputy Conservator of Forests, and Mr. G F Prevost, Deputy Conservator, respectively made over and received charge of the Ellichpur Division on the afternoon of of the 13th July 1887.

Pandit Suraj Narayen, Assistant Commissioner, 3rd Class, has been granted privilege leave for 3 months with effect from 1st December 1887 or from such date as he may avail himself of it.

Under section 6 of the Indian Registration Act, 111 of 1887, the Resident is pleased to appoint Ramchandra Ganesh Deshpande to be Rural Sub-Registrar of the Borakhadi Sub- district of the Buldana District, *vice* Ganesh Balwant Deshpande deceased.

---

We have elsewhere given the result of the Departmental examinations held at Amraoti on the 10th 11th and 12th October 1887. We are glad to see that our worthy Commissioner recognize the real importance of these examinations and makes appointments to the higher places in the Revenue Judicial Departments on the con[dit]ion of passing the test. But we do not see how men who have not passed any Departmental Examination are allowed to remain at the head of largest and most important District offices in the Province, when the competent men who have passed their Examination are available and can be given preference. Appointments of such men must render the working of the offices inefficient.

---

## वऱ्हाड.

आज४ वाजतां अकोला येथें नळाचें पाणी आणण्यासाठीं व त्या संबंधीं खर्चा बद्दल पैशाचा विचार करण्या करितां टौनहालांत जाहीरसभा भरणार आहे तर याजबदलचा विचार करण्या करितां ग्रामस्थ लोकांनीं अगत्य यावें अशी आमची त्यांस विनंती आहें.

रा. रा. गोविंद गंगाधर तहसिलदार. मेहकर यास १०० रु० पर्यंत दिवाणी अधिकार मिळाला.

कुमार श्रीहरबांजी रावजी अत्याची यांस एक महिन्याची हकाची रजा ता. २४ नवंबरपासून मिळाली.

पंडित सुरज नारायण, आसिस्टंट कमिशनर थर्डक्लास यांस ता१ डिसेंबर १८८७ पासून तीन महिन्यांची हक्काची रजा मिळाली

रेजिस्ट्रेशन आक्टाचे कलम ३ अन्वयें रा. रा. रामचंद्र गणेश देशपांडे यांस बुलढाणें जिल्ह्यांतील बोराखडी सर्व डिव्हिजनचे रुरल सब रेजिस्ट्रर नेमिलें.

गेल्या अक्टोबर महिन्यांत ता१०।११ आणि १२ रोजीं जी उमरावतींत हायस लोअर स्टॅंडर्डची परीक्षा झाली तींत खालीं लिहिलेले अफिसर पास झालें.

हायर स्टांडर्ड. सर्व विषयांत.

मि. सी. एच. प्राईस ए. अ. क.

रा. रा. वामन नारायण बापट ए. अ. क.

रा. रा. बाळकृष्ण बळवंत मुळे क्लार्क आफ कोर्ट.

कुमार श्रीहरबांजी रावजी अत्याची.

मि. माणिकशा रतनजी ए. अ. क.

रा. रा. गणपत बाबाजी ए० अ० क०

रा० रा० नारायण पांडुरंग जोशी मि० शापुरजी वीरजी व मि० मीर मुबारक अली तहसिलदार हे फक्त लॉ, रेव्हिन्यु आणि मराठी मध्यें व मि० गोविंदराज मुदलीयार तहसिलदार फक्त क्रिमिनल लॉ, रेव्हिन्यु अकौंट्स् आणि मराठी मध्यें.

क्यापटन् जे० जी० मारिस अ० क० हे मराठींत. बाकीचे सर्व विषयांत सेंट्रल प्राव्हिन्ससमध्यें पास झालि आहेत.

लोअर स्टांडर्ड.

सर्व विषयांत.

क्यापटन् आर० व्ही० ग्यारेट असि० कमि०

रा० रा० वासुदेव विठ्ठल चांदेकर दि० क्लार्क आफ कोर्ट.

रा० रा० रघुनाथ बळवंत क्लार्क आफ कोर्ट.

मि० हायदर अलीखां अत्याची.

मि० राहिमतुला नायब तहसिलदार.

मि० पी० जे० थोरीस दि० क्लार्क आफ कोर्ट.

रा० रा० लक्ष्मण नारायण क्लार्क आफ कोर्ट.

मि० सीतलसिंग नायब तहसिलदार.

मि० आर म्याक् गिल, ए० अ०क० मि० सैफुद्दीन लालखां क्लार्क आफ कोर्ट आणि मि० जी सुबरायलु नायडु तहसिलदार हे क्रिमिनललॉ, रेव्हिन्यु, आकौंट्स् आणि मराठीमध्यें.

रा. रा. कृष्णाजी महादेव क्लार्क आफ कोर्ट आणि गणेश गोपाळ क्लार्क आफ कोर्ट क्रिमिनल रेव्हिन्यु आणि आकौंटस् मध्यें

रा. रा. वामन गणेश तहशिलदार फक्त ला आणिरेव्हिन्यु मध्यें

---

## फोटोग्राफ.

आह्मी यंदाच्या एज्युक्याशनल कानफरन्नसच्या मंडळीचा एक मोठे साइझवर व एक ल्हान साइझवर असे फोटो घेतले आहेत व ते चांगले साफ निघाले आहेत. मोठे साइझाची किंमत दर प्रतीस १॥ रुपया व लहान साइझचे दर प्रतीस आठ आणे मागिल दोन वर्षाच्या ही कानफरन्सचे फोटो आह्माजवळ आहेत तिन्ही सालचे घेतल्यास ३ रुपयास मिळतील पत्र येतांच रवाना करूं.

नारायण गोविंद चिंचवडकर
फोटोग्राफर, उमरावती.

---

नोटीस.

नोटीस रामनाराण वल्लद राम बिलास मारवाडी राहणार माहुली जाहगिर तालुके उमरावती, यांस नोटीस देणार श्रीराम वल्लद गुमानीराम मारवाडी राहणार उमरावती नोटीस देतो कीं तुम्हीं प्रमोदसिंघुतून दिलेलं नोटीस तारीख १०।११।८७ इसवीची पावली. तुह्मी आम्हाला खोटी नोटीस दिली आहे आम्ही तुंह्माला रुपये दिल्यानंतर तुम्हां पासून आम्ही हुंड्या लिहून घेतल्या तुम्हीं आम्हाला खोटा नोटीस दिलि याबद्दल आम्हीं योग्य तजवीज रितीवर हुकुम करणार आहो व या नोटीशीचा खर्च तुंम्हाला द्यावा लगेल कळावे तारीख १८।११।८७ इसवी. दस्तुर बाबा गणपतदेव.

श्रीराम वल्लद गुमानीराम
मारवाडी राहणार
उमरावती.

---

## वर्तमानसार.

विलायतेंतील वर्तमानपत्रांतून इंग्लिश [लो]कांचा आपल्या सरकारास उपदेश चालला [आ]हे. इग्लंडचा अंमल हिंदुस्थानांत स्थाईक होण्यासाठीं इंग्लंडनें चीन देशाशीं सख्य केलें ह्मणजे बस आहे, एशिया खंडांतील रानें रानटी त्यांच्याशीं आपणांस क.य करावयाचें आहे, अशी जी आजपर्यंत इंग्लंडास बेपर्वाई होती ती लयास जाऊन प्रत्येक सुधारलेल्या राष्ट्रास आमच्या रानटी लोकांबरोबर सख्य करावेसें वाटूं वागलें आहे, ही आनंदाचीच गोष्ट आहे. फ्रेंच लोकांस चीन आपला मित्र असावा असें वाटत आहे. जर्मन लोकांची इच्छा चीननें फ्रेंच व इंग्लिश आपले शत्रु समजून आपणांस सामील व्हावें अशी आहे. रशिया हा चीनशीं गोडीगुलाबी करून आपला मतलब–व्यापारा करितां समुद्रकिनाऱ्याची प्राप्ति–साधून घेण्याच्या खटपटींत आहेच. आतां इंग्लिश लोकांचे डोळे उघडले आहेत–चीनची लोकवस्ती पसतीस कोटी आहे. चीनदेश जर आपणांशीं मिळून राहिला, तर व्यापाराच्या संबंधानें अतोनात फायदा होईलच. परंतु राजकीयदृष्टीनें रशिया प्रतिबंध करण्यास फार उपयोगी पडेल. शिवाय कानडामधून जो नवा मार्ग सुरू करण्यांत आला आहे, त्यामुळें चीनदेशाशीं सख्य असणें इंग्लंडास फार जरूर आहे तरी युरोपांत लढाई उद्भवून, सुएझकालवा जर बंद झाला तर केप आफ गुडहोपवरून जाण्यापेक्षां हा मार्ग फार सोयकर होईल असें या लोकांचें मत आहे. इंग्लिश लोकांनीं स्वतःच्या फायद्यासाठीं चीनदेशाशीं खुशाल सख्य करावें परंतु चीनच्या सख्यत्वाला जे इतके महत्व देण्यांत येत आहे, तें आम्हांस मान्य नाहीं. चीनदेशाशीं सख्य करण्यापेक्षां, हिंदुस्थानांतील राजेलोकांचीं व प्रजेचीं मनें इंग्लिश लोकांनीं प्रथम आपणांकडे वळवून घेतलीं पाहिजेत. निझामानें स्वामिभक्ती दाखविण्यासाठीं मोठ्या औदार्यानें साठलक्ष रुपये जर देऊं केले आहेत, तर इंग्लिशांनीं जगाच्या वहिवाटी प्रमाणें त्यास योग्य मोबदला द्यावा–वऱ्हाडप्रांत जो हिसकून घेतला आहे, तो जर यावेळीं परत दिला तर निझामास किती बरें आनंद होईल! हिंदुस्थानांतील प्रजेच्या अडचणीही दूर करून टाकाव्या. या प्रमाणें केल्यास रशियाची इंग्लंडास मुळींच भिति बाळगिण्याचें कारण नाहीं–या उपर हवें असल्यास चीनशीं सख्य करण्याचा त्यांनीं यत्न करावा.

अयुबखान आपण होऊन इंग्रजांच्या स्वाधीन झाला–महमद शरिफखानचा मुलगा सरदार हशीमखान याच्या प्रयत्नामुळें अयुबखान इंग्रजांच्या स्वाधीन झाला. हशीम हा आफगाण सरदारांपैकीं एक सरदार आहे. परंतु काबुलच्या गादीवर अबदूल रहिमानचा हक्क इंग्रज सरकारानें कबूल केल्यामुळें हा सरदार कंदाहारास पळून गेला, आणि मशी नांवाच्या शहरीं अयूब यांस मिळाला. आणि तेव्हां पासून तो मश्अदु येथें राहत असे, १५ दिवसांपूर्वीं अयुबखानानें या सरदाराशीं बोलणें लावलें. हें बोलणें हशीम सरदारानें काबुलचा पोलिटिकल एजंट कर्नल म्याक्लिन यांस कळाविलें. त्यानंतर अयुबखान म्याक्लिनच्या स्वाधीन झाला. म्याक्लिननें चांगल्या रीतीनें आपणास वागवावें अशी अयुबची [इच्छा] होती. अयुबखान पळून गेल्यानंतर कांहीं दिवसपर्यंत तेहरान येथें इंग्लिश वकिला बरोबर बोलणें करीत होता, आणि त्याचा पत्रव्यवहार हिंदुस्थान सरकाराशीं ही चालूं होता. ज्या अयुबखानानें इंग्रजाची दोन पलटणें एकेवेळीं कापून टाकिलीं तो आपण होऊन इम्रजांच्या स्वाधीनें होईल ही गोष्ट मोठ्या आश्चर्याची नव्हे काय! आणि त्यास जर अशारीतीनें इंग्रजांच्या स्वाधीन व्हावयाचें होतें तर तो तेहरान येथून तरी कां पळाला असतां! एकंदरींत आम्हांस तर ही बातमी विश्वसनीय वाटत नाहीं; पण न जाणो इंग्रज सरकाराजवळ तशीही कांहीं जादू असली तर नकळे.

निजामानें हिंदुस्थानसरकारास जी ६० लक्षाची देणगी दिली त्यावरून रशिया हिंदुस्थानावर खरा येणार असें हिंदुस्थानसरकार व हिंदुस्थानांतील राजेरजवाडे यांस वाटतें असें एकेठिकाणीं प्रसिद्ध झालें आहे.

ब्रह्मदेश आणि चायना या दोहोमध्यें रेलवे करण्याचें घाटत आहे.

तिबेटांत रेशिम आणि कापड या रूपानेंच पगार देण्यांत येतो.

कोल्हापूरचे तरुण महाराज विलायतेस जाणार ह्मणतात व त्यांच्या बरोबर कर्नल रेव्हेज हे रक्षक ह्मणून जाणार असें ऐकिवांत आहे.

तुम्हीं जे हिंदुस्थानसरकारास ६० लाख रु. दि[ले] त हें काम फार वाईट केलें, तुम्ही ब्रिटीश सरकारवर मुळींच विश्वास ठेऊं नका. आणि हिंदुस्थानच्या लोकांची परतंत्रतेपासून मुक्ती करण्याकरितां तुम्हीं मला आपल्या भावाप्रमाणें माना अशा अर्थाची धुलिपसिंगानें निजामास एक तार केली होती व ती तार निजामानें इंग्रजसरकाराकडे पाठवून दिली असें ह्मणतात. ठा० अ०

इनकमट्याक्स दुणावण्याचा रंग दिसतो.--ब्रह्म देश खालसा केल्यापासून आजपर्यंत जो खर्च आमच्या सरकारास करावा लागला तो अजमासापेक्षां पुष्कळच फाजील झाला आहे. त्या मुळें आमच्या खजिन्यास एवढी भगळ पडली आहे कीं, ती खर्चाच्या काटकसरीनें खचित भरून येत नाहीं अशी सरकारी अधिकाऱ्यांची खातरजमा होऊन चुकली आहे. सबब येत्या वर्षी इनकमट्याक्स सवा अगर दीडपटीनें तरी जास्त करावा लागेल तरच ती भगळ भरून येईल, नाहीं तर येणार नाहीं असा अधिकाऱ्यांचा पूर्ण समज आहे असें "इंग्लिशमन" पत्रांत लिहिलें आहे. इंग्लिशमन पत्राची बातमी बहुतेक खोटी नसावी, खाजिन्यास दुःसाध्य मगळ खरीच पडली आहे, हिंदुस्थानचे लोकांवर पाहिजे तो कर लादला तरी ते दुःखानें कां होईना पण देत आहेत, तेव्हां सगळीच सोय आहे. यांत एवढें मात्र एक संकट आहे कीं, हा कर वाढला म्हणजे सरकारी गोरे कामगार जबर गिल्ला करतील याची अधिकाऱ्यानें काय वाट केली! शु० सु०

विलक्षण तोफः–अमरिकेंत एका कारागिरानें एक नूतन विक्राळ तोफ बनविली आहे. ह्या तोफेच्या अंगी इतकी भयंकर शक्ति आहे कीं, केवढेंही मजबुत व मोठें लढाऊ जाहज असलें, तरी तें ह्या विक्राळ तोफेंतील दोन गोळ्यांच्या माऱ्यानें ५ मिनिटांच्या आंत आगदीं छिन्नभिन्न होऊन जातें. शिकस्त झाली अमेरिकन् लोकांची.

पाऊस एकाएकि मनस्वी पडल्यामु[ळें] कोकण, ठाणेजिल्हा वगैरे प्रांतांत धान्याचें फार नुकसान झालें.

पंढरपूर येथें पटकीची सुरुवात झाली आहे यात्रा व महामारी यांची ही केवढी मैत्री!

मुऱ्या पकडला; परंतु त्याच्या भिल्लाचें बंड चालूच आहे. यानें पोखर गांवी चौधरी मोहन यांचे घरीं जाऊन त्याच्या आईस असें सांगितलें कीं, मला पकडण्यासाठीं तुझ्या मुलास जो चांदीचा तोडा दिला आहे, तो मला दे. परंतु तो न मिळाल्यामुळें त्यानें त्या म्हतारीचें नाक कापविलें, व मोहनच्या स्त्रीच्या अंगावरील सर्व दागीनें घेऊन व गांवांत थोडीशी लुटालूट करून राजरोष रीतीनें निघून गेला. पोलिसानें पुष्कळ धामधूम केली; परंतु व्यर्थ.

## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असेंसमजूं नये.

रा. रा. वऱ्हाड समाचार पत्रकर्ते यांसः–

वि० वि० आपलें पत्र अकोलें येथें निघत असून आपण लोकांचे हिता करितां सर्व माहिती मिळवून छापतां या बदल सर्व लोक आपले आभारी असतील. परंतु अकोलें येथें निघणारें तीनही पत्रास दिवाणी कोर्टांतील पक्षकारांस कसे हाल सोसावे लागतात या बदल खरी हकीकत मिळत नाहीं असें दिसतें करितां ती मी आपणास देतों ती आपण आपले येत्या अंकीं प्रसिद्ध करून गरीब बिचारे पक्षकारांची दाद लावाल तर त्यांजवर फार उपकार होतील.

येथील स्मालकाज कोर्टाची इमारत बरीच लहान असल्या मुळें त्यांतील जागा सरकारी नौकरांसही प्रशस्तपणें पुरत नाहीं व बाहेर व्हरन्डा आहे तो अतिशय लहान आहे. दररोज स्मालकाज कोर्टांत कमीत कमी तरी सरासरी वादी प्रतिवादी व साक्षीदार मिळून शंभरावर लोक येतात व त्यांचे सोयी संबंधानें त्यांची स्थिति फारच शोचनीय आहे. सदर्हु पक्षकार लोकांपैकीं जर कांहीं लोकें बाहेरील व्हरन्ड्यांत बसूं लागले तर कोर्टाचे शिपाई त्यांस तेथून हांकून लावतात कारण सदर्हु व्हरॅन्डा जड्ज साहेब यांचे बसण्याचे ठिकाणाचे अगदीं समोर आहे व त्यांत इतके अनेक गांवचे लोकांस एक सारखे आठ दहा तास चित्रासारखे तटस्थ बसणें अगदीं अशक्य आहे. दयाळू सरकारानें गरीब बिचारे पक्षकार लोकां करितां कोर्टाचे इमारतीचे बाजूस लागूनच दोन कोठड्या बांधल्या आहेत त्यांतील जी मोठी कोठडी तीत सभ्य मंडळी (वकील) १०।१२ जण ह्यांनीं आपल्या गाद्या तक्ये चैनेनें पसरून व्यापून टाकिली आहे व ह्या संभावीत ह्मणविणारे वकीलांत कित्येकांत आपसांत बेबनाव असले कारणानें त्यांच्यापैकीं तीन चार वकीलांनीं दुसरे बाजूस असलेली धाकटी कोठडीही सर्व अडकून टाकली आहे. ह्या घेंडांनीं ह्या दोन्ही जागा बळकाविल्या मुळें जे पक्षकार खरोखर आपले कामाकरितां येऊन कोर्टांत कोर्टफी ह्मणून कर भरतात त्या बिचाऱ्यांस उन्हाळ्यांत उन्हांत तळमळत व फारच झाले तर लिंबांचे झाडाचे अर्धे छायेंत व पावसाळ्यांत तर चिखलात व पावसांतच बसण्याचा व उभे राहण्याचा प्रसंग येतो. पण ह्यांच्या ह्या दुर्घट हालाची दाद घेतो कोण! जड्ज्य साहेब बाहादूर ह्यांची स्वारी कचेरीत येतांनां हा सर्व प्रकार त्यांस चांगलेपणें पाहतां येतो परंतु तें तसेंच सलाम घेत घेत स्वस्थानीं जाऊन बसतात मग तेथे गेल्यावर त्यांस पक्षकार लोकांचे हालाचे स्मरण येण्याचें कारणच नाहीं.

वकील लोक ज्या ठिकाणीं बसतात त्यां ठिकाणीं जर कोणी एखादा पक्षकार सहजवृत्त्या नजीक बसला तर त्यांस हे कायदेपंडीत म्हणतात कीं "बेआदबी करितोस ऊठ येथून" अशा प्रकारचे अपशब्द अद्वातद्वा बोलून त्यांस ज्या जागेवर बसण्याचा हक्क आहे तो त्यांजपासून काढून घेतात. वकील लोकांस जागा बांधून देऊन त्यांची बसण्याची सोय सरकारांनीं केली पाहिजे अशा बदल कायद्यांत कांहीं नियम आढळत नाहींत जर हे इतर पक्षकारांप्रमाणे असतील तर त्यांस आपले हे गाद्या तक्यांचे बंड मोडले पाहिजे.

ह्या वकील लोकांपैकीं कितीएक वकील तर असें समजतात कीं सर्व जगांत अब्रु, प्रतिष्टा, लौकिक व मोठेपणा हे सर्व गूण एकदां सन १८६५ सालांत परिक्षा दिली तेव्हांपासून आपले आंगात ओतप्रोत भरले आहेत व त्या जोरांत ते वाटेल तसें करतात.

कोर्टांत बसण्या करितां कांहीं बेंचे ठेविलेलीं असतात त्यावर बसण्याचा हक्क फक्त आम्हांसच आहे असें हे वकील लोक समजतात. दुसरा एखादा कोणी [बसू]न बसला तर त्यांस "तूं ऊठ" असें म्हणतात त्या बसणारे मनुष्यां जवळ फक्त पैसाच नसतो बाकी सर्व प्रकारे तो लायक असतो परंतु एक पैसा नसल्यामुळें त्यांस नाईलाजास्तव उठावें लागतें. ज्यांस उठवून दिलें त्यांचे योग्यतेचा विचार करवत नाहीं अगर करण्याची शक्ति नाहीं. कधीं कधीं तर असें प्रकार दिसतात कीं ज्याला बेंचावरून उठवून दिले तो अधिकारावर गेल्यामुळें त्याचे पुढें या वकीलांस काम करण्यास जावे लागतें. वकील लोक संभावीत, शहाणे, विचारशील, म्हणावें तर वऱ्हाडांतलि काहीं वकील इतर जातीचे कुणबी व अतिशूद्र वगैरे लोकांसारख्या एकमेकांस आपले + + + + वरून कधीं कधीं भर कोर्टांत व भर रस्त्यावर ही + + देऊन पुत्रांना मदत घेऊन मारामारी करतात. असो.

पक्षकार लोकांस बसण्याचे जागे विषयीं व कोर्टात असलेले बेंचावर कोणी बसावें ह्या विषयीं निकाल लागावा म्हणून एडिटरराव ही खरी माहिती आपणांस दिली आहे तर आपण हें प्रकर्ण निदान आफिसर लोकांचे कानांवर तरी घालाल आशी अशा धरून हा विषय तूर्त संपवितों.

आपला
एक निस्पृह पक्षकार.

हें पत्र आकोला येथें कै० बा० [...] बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमा[चार ...]खान्यांत नारायण खंडेराव फडके [...]

साहामाही
साल अखेर
किरकोळ अंकास



नोटिशीबद्दलकांचे असें मत आ
… व आपल आचारविचार भिन्न असल्यामुळें त्यांचें आपलें दळणवळण णें फारच कठीण अहि कांहीं अंशीं ही आफि० खरी असेल; परंतु त्यांचा आपल्या स रेसिडेंट सेल तरी निदान क्कासारख्या ठिकाणे वऱ्हाडचे ध कां होऊं नये हें समजत नाहीं.
आपलें दळणवळण वाढल्यास दोवा होणार अहि. व तेव्हां त्यांची अ…िहल आफि० वाढेल असे उ… आपुणास ये… …ला यांस रेसिडेंट साहेबांचे असिस्टंट आणि हैद्राबाद येथील ठग व डाकेखोर मंडळीचा दंगा मोडून टाकण्या करितां असणाऱ्या खात्याचे जनरल सुपरिन्टेंडन्ट लेफटेनन्ट एम्. ए. टायघे साहेब यांच्या जागीं बदलून मि० टायघे यांस परत त्यांच्या लष्करी कामावर पाठविलें.

---

येथील स्पेशिअल असिस्टंट कमिशनर मि. ओवर्ड साहेब हे ह्या प्रांतीं दरमहा रुपये हजारचे जागीं राहाण्यास खुष नसू। ते आपली बदली मध्यप्रांतांत नागपूर इलाख्यांत व्हावी म्हणून युक्तिप्रयुक्तीनें जुळवाजुळव करीत असल्याचें समजतें. ह्या त्यांचा प्रयत्न फलद्रूप झाला तर त्यांचे प्रयाणापासून पश्चिम वऱ्हाडांतील खरा खरा इनसाफ मिळवूं इच्छिणाऱ्या सर्व गृहस्थांस महद्दुःख होईल. कारण साहेब बहादुरांची काम करण्याची शैली वाखाणण्या लायक असल्यामुळें न्यायमुनसबीचीं कामें योग्य रीतीनें होऊन प्रजेसही फार हितावह होत अहित.

---

मि० महमद यासीनखा असि० कमिशनर हे चालूं महिन्याचे अखेरीस आपले हक्काच रजेवरून परत येऊन बडनेरा येथील कोर्टावर मुक्रर झाल्यावर तेथील जज्ज मि० गणेश श्रीकृष्ण खापर्डे यांस रेव्हिन्यू कोड रचण्याचे कामीं कांहीं महिने उमरावती येथें कमिशनर साहेब यांचे आफिसांत स्पेशिअल ड्युटीवर ठेवणार अहेत.

---

आमचे सर्व वऱ्हाड प्रांतांत फिरलेले अनुभवशीर व लोकप्रिय रा. रा. बापू साहेब श्रीकृष्ण नरहर खापर्डे जे हल्लीं तेल्हाऱ्याच्या कोर्टावर विराजमान आहेत त्यांच्या वयाची ईयत्ता ५५ वर्षांची तारीख १२ जून सन १८८८ रोजीं पुरी होणार सबब ते आणखी एक वर्ष राजसेवेंत सरकारनें ठेवण्याची मुदत वाढवून मागणार अशी लोकवार्ता आहे.

---

मि० व्हाईट साहेब सुपरीनटेंडिंग इंजिनिअर प्रांत वऱ्हाड हे हैद्राबादेहून उमरावतीस जाऊन तेथील व इलिचपूर जिल्ह्यांतील कामें तपासून आज रोजीं यवतमाळा कडेस जाणार अहित. नंतर तेथून अकोल्यास आल्यावर येथील मंडळींनीं गांवांत नळाचे पाणी आणण्या बदल जी आपली पूर्व योजना चालविली अहि ती त्यांच्या पुढें आणन त्याबदल भवतिनभवति करण्याची त्यास उत्तम संधी सांपडेल. साहेब मवसूफ हे ब्रह्मदेशांतून दोन महिन्यांपूर्वी आले असल्या मुळें हा प्रांत त्यांना सर्वांपरीनें नवा अहि सबब आमच्या ज्या ज्या जरुरीच्या गोष्टी असतील त्या ते सहजी समजून घेतील.

---

वऱ्हाड प्रांताचे पूर्व व पश्चिम असे दोन विभाग राज्य कारणाकरितां करविणारे जे माजी कमिशनर मि० लायल साहेब हे सन १८७२ सालीं, मि०सांडर्स साहेब त्या वेळचे रेसिडेंट यांचे शिफारशीवरून इंडिया सरकारचे सेक्रेटरी नेमिले होते. त्यांची पुढें कामाची बहादुरी पाहून सरकारनें त्याजला इलाखा लखनौ व आग्रा येथील दरमाहा रुपये ८,००० वर लफटनेन्ट गव्हरनर नेमिलें होतें. त्यांची नौकरीची ३० वर्षें पुरी झाल्या मुळें ते आपल्या हुद्याचा राजिनामा देऊन तारीख २ दिसेंबर १८८७ रोजीं मुंबईहून 'व्हरन्यान' नांवाचे आगबोटीनें स्वदेशीं गमन करतील. साहेब बहादुर हे हिंदुलोकांचे व त्यांतून मुख्यत्वें करून ब्राह्मणांचे पुरस्कर्ते नसून यवनाचे पूर्णपणें आश्रयदाते बनले होते. साहेबांची निवड लखनौकडे होऊन गेल्या मुळें त्यांच्या स्वभावास अनुकूल अशी व्यवस्था घडून आली हें एकापक्षीं बरें झालें होतें.

---

इतिहासप्रसिद्ध फत्तेखेलडा तालुके मेहकर जिल्हा बुलढाणा येथें सन १८७१–७२ सालांत कोर्ट टेविल्यास कसें काय चालेल हे पाहण्याकरितां सरकारनें मि. सयद अबदूल हक्क एक्स्ट्रा असि० कमि० यांस मुकर केलें होतें परंतु तेथें कोर्टाचें काम चालेल असा रंग न दिसल्या मुळें कोर्टाचा बेत रहित केला होता. हल्लीं पुन्हां त्याच ठिकाणीं सरकारनें कोर्ट स्थापून त्यावर रा. रा. अंबादास संतो एक्स्ट्रार असि० कमिशनर यांस नेमिलें अहि. दिवाणीचा ५००० रुपये पर्यंत अधिकार व मुलकी व फौजदारी तालुका आफिसरचा अधिकार देणार आहेत असें समजतें.

---

रा. रा. गणेश बापुजी यांस वाशिमाहून एक्स्ट्रा असि० कमिशनरचे हुद्यावरून आपले पूर्वस्थानीं तहशिलदारीवर त्यांचे मागाहून झालेले अक्टिंग एक्स्ट्रा असि० कमिशनर कायम ठेवून परत धाडितात यांतील खरें इंगित कळत नाहीं. 'एका हातानें टाळी वाजत नाहीं' अशी म्हण आहे तसें तर नसेल ना?

---

रा. रा. वामन नारायण बापट एक्स्ट्रा असि० कमिशनर हे आपले मलकापूरचे पूर्वींचे जागेवर येऊन दाखल झाले व खामगांवास क्याप्टन मारिस आपलें कामीं रुजूं झाले.

---

रा. रा. बासुदेव सदाशिव पिसोळकर आफि० एक्स्ट्रा असि० कमिशनर जिल्हा वणी हे आपल्या पूर्वस्थानीं कमिशनर साहेबांचे शिरस्तेदारीवर महिना अखेर परत येतील व त्यामुळें ज्या ज्या अक्टींग नेमणुका दोन तीन झालेल्या आहेत त्याही मागें हटतील.

---

यवतमाळ येथील मागील सेशनचे मोकदम्यांत असेसर लोकांस वेळेवर समन्सें पाठविलीं गेलीं नाहींत म्हणून तेथील अक्टिंग शिरस्तेदार रा. रा. बाळकृष्ण बळवंत सुळे यांस ४० रुपये दंड मे. जुडिशीअल कमिशनर साहेब यानीं केल्याचें समजतें.

---

स्पेशिअल असिस्टंट कमिशनर्स यास हल्लीं जे जिल्हा कोर्टाचे अधिकार दिले आहेत त्या मध्ये जिल्ह्याच्या सिव्हिल जज्जाचा अधिकार जिल्ह्याचे मानाने कायम ठेवून नसते जिल्हा कोर्टाचे आपणाकडस दिलल काम मात्र करण्याचा अधिकार स्पेशल असि. कमिशनर यास अहि असा खुलासा नसल्या मुळें उमरावती येथील नवीन नेमलेले स्पेशल असिस्टंट कमिशनर क्याप्टन् वारन हेतिगज् याचा डेपटी कमिशनर कर्नल बुल्क याशीं मतभेद पडल्या कारणानें अधिकार संबधानें त्या मतभेदाचा निर्णय ठरण्या करित। प्रकरण मे. ज्युडिशिअल कमिशनर याजकडे गेले आहे. तेथून प्रसिद्ध झालेला छापील जाहिरनाना दुरुस्त करण्यासाठीं स्पेशल असि० कमिशनर हे केवळ सानकामीं लोकांप्रमाणे दिलेल्या मोकदम्याचा निकाल करण्या पुरते मात्र अधिकारसंपन्न मानिले जावेत अशा अर्थाची सूचना होणार असल्याचे कळतें; असें न झाल्यानें दिपटी कमिशनर हे दिवाणी कामासंबंधानें जिल्हा जज्ज म्हणून अजिबात नाहींसे होणार आहेत याकरितां त लोक आपला अधिकार आपले नायबाचे हातीं कामा पलिकडेस दिला जाऊं नये असें जें इच्छितात तें त्यांचें स्थानाचे मानान उक्तच आहे.

---

पंडित सुरज नारायण यांनीं तीन महिन्याची हक्काची रजा तारिख १ दिसेंबर सन १८८७ पासून घेतल्या मुळें त्यांचे जागीं पक्की नेमणूक मि० अयोध्या प्रसाद एक्स्ट्रा असि० कमिशनर उमरावती यांची झाली आहे.

---

इंदूर जवळील छावणी मोहो येथील असि० बाजार मास्तर क्याप्टन् डेव्हिस यांस मयत कर्नल थामसन साहेब यांचे बगावर्गीत वऱ्हाड प्रांतांत असि० कमिशनर नेमून इलिचपूर येथें त्यांची नेमणूक केली आहे.

---

मे० डाक्टर लिटल साहेब सानिटरी कमिशनर यांच आफिसांतील हेड क्लार्क मि० जार्ज यांस एक्स्ट्रा असि० कमिशनरचे जागे करितां तुमचे नांव उमेदवारांचे फेरीस्तींत दाखल करावें कीं नाहीं असें विचारिल्यावरून त्यांनीं ती गोष्ट नाकबूल करुन वऱ्हाडांत कोणतेंहा ठिकाणीं २०० रुपयांहून अधिक पगाराची हेड क्लार्कची जागा पत्करण्याची आपली इच्छा प्रदर्शित केली. अशा जागा वऱ्हाडांत तर दोनच आहेत—एक जुडिशिअल कमिशनरचे आफिसांत दरमहा ३०० रुपयांची व दुसरी कमिशनरचे आफिसांत ४०० रुपयांची. मग असा बढतीचा त्यांचा समय कधीं येईल कोण जाणे!

---

जुडिशिअल कमिशनरच्या आफिसांतील ६० रुपयाचा क्लार्क मि. लारन्स मयत झाल्या मुळें त्याचे वर्गांवर्गीत रावसाहेब वामनराव भोळे यांचे जामात रा. रा. गणपतरावजी यांस नेमिलें.

---

रा. रा. रामचंद्र नारायण देशपांडे क्लार्क आफ डेपुटी कमिशनर कोर्ट अकोला यास त्याच्यां कामाच्या हयगयी बदल एक आठ वड्याचा पगार दंड झाला. त्याच आफिसांतील रा. रा. पुरुषोत्तम व्यंकटेश व बाळकृष्ण रामचंद्र यासही नुकतेच दंड झाले होते. या प्रमाणे मराठी आफिसांतील तीन गृहस्थ दंडाच्या शिक्षेस पात्र झाले, एतद्यावरच आफिसच्या अव्यवस्थे बदल व्हावयाची ती शिक्षा संपावी असें आम्ही मना पासून इच्छितों.

---

आम्ही मागें लिहिल्या प्रमाणें सभा भरून पाण्याचे नळ गावात आणण्याच्या संबधानें ६०००० रुपये कर्ज सरकार देत आहे तें फेडण्यास अकोल्यात येणाऱ्या कर न बसलेल्या मालावर नवीन कर बसवावा आणि वर्षांस लागणाऱ्या ८००० रुपयांच्या खर्चा करितां सर्व लोकांवर पाण्याचा निराळा कर बसवावा असें ठरल्याचें प्रोसीडींग वरून समजतें.

---

यंदाच्या मुंबई युनिव्हर्सिटीच्या फर्स्ट बी. ए. परीक्षेचा निकाल गेल्या शुक्रवारीं प्रसिद्ध झाला त्यात २८३ उमेदवारां पैकीं ९९ उमेदवार पसार झाले.

---

येत्या गुरुवार पासून रंगोलड कोठी येथील नायझाम कालिज मध्यें 'मिडल स्कूल' परीक्षेस सुरुवात होऊन ७ वे तारखेस संपेल. आणि तारिख ८ पासून 'अपर प्रायमरी' परीक्षा व स्त्रियांची 'हायर' परीक्षा सुरू होऊन पांच दिवस चालेल.

---

'फिरस्ता'—मुनसिपालीटीचा जमादार बळिराम केशव यांस 'झालेला दहा रुपये दंड कमिटीनें द्यावा असा ठराव पास झाला' हा न्याय्य नव्हे अशा मतलबाचें आपलें पत्र आलें तें उशीरां पावलें. माजिस्ट्रेटाच्या ठरावास नाखुष होऊन अशा रितीनें दंड पर देणें म्हणजे कमिटीने आपले पैशाचा अपव्यय करणें, नौकरांस अन्यायाचे वर्तन करण्यास उत्तेजन देणें व सरकारनें केलेल्या कायद्याचे हेतूच्या आड येणें होय.

---

## वर्तमानसार.

मनी आर्डरनें धारा भरणें—बंगाल्यांतील दोन जिल्ह्यांत गतवर्षी जी पद्धत सुरू केली होती. ती नामी चालली असें पाहून सर्व इलाख्यांत या पद्धतीनें सारा घेण्यांत यावा असा ले० गव्हरनरानीं ठराव केला.

मे० कर्नल रिव्हीज पोलिटिकल एजंट सदर्न महाराष्ट्र यांनीं श्री० तात्या साहेब सांगलीकर यांस कळविलें कीं, सरकारानें आपल्यास मुखत्यारी देण्याचा ठराव केला तथापि कारभाऱ्याच्या जागेबद्दल सरकारच्या परवानगीशिवाय आपल्यास कमजास्तपणा करतां येणार …num, with पक्की लक्षांत ठेवावी. …s of such stu-
education was finished,
, resolved that so much of

…' The
the flowing

बंगालइलाख्याची एकंदर लोकसंख्या ६,६६,९१,४५६ आणि मुंबईइलाख्याची लोकसंख्या १,६४,५४,४१४ आहे. बंगालइलाख्यांतील लोकावर राज्य करण्या बद्दल ९,२७,६७,६४० रु. खर्च येतो; परंतु मुंबई इलाख्यांतांतील लोकांवर राज्य करण्याबद्दल ६,७४,८६,६१० रु. खर्च येतो. यावरून बंगाल्यांतील राज्यकारभार चांगल्या रीतीचा नाहीं किंवा मुंबईइलाख्यांतील राज्यकारभार फार किंमतीचा आहे असें ठरतें.

इंनूकंटॅक्स बसल्यापासून कलकत्यांतील व्यापारी लोकांना आपले जमाखर्च पाहिजे तर गुप्तरीतीनें ठेवावे असा ठराव झाला होता परंतु यापुढें कलेक्टर कचेरींत कित्येक कारकुनांस तुमचा जमाखर्च चांगल्या रीतीनें तपासांत यावा असा बोर्ड आफ रेव्हेन्यूकडून त्या व्यापाऱ्यांस हुकूम सुटला आहे यावर तेथील व्यापाऱ्यांनीं सरकारांत अर्ज केला आहे.

पब्लिक सर्विस कमिशनच्या चौकशीवरून पोस्टखात्यांत एकंदर ४० हजार काम करणारे लोक आहेत व त्यांपैकीं विलायतेहून आलेले असें ४० लोक आहेत. हिंदु आणि युरोपियन लोकांस जातिभेद मनांत न आणितां जागा देण्यांत येतात पोस्टखात्यांतील एकंदर काम फार सुरळित रीतीनें चाललें आहे असें बाहेर आलें आहे.

सातारा जिल्ह्यांतील वाई तालुक्यांत नवऱ्याशीं भांडण झाल्यामुळें एका बाईनें आपल्या मुलास कंबरेशीं बांधून विहिरींत जीव दिला.

आपल्या ताब्यांत असणाऱ्या पैशाची अफरातफर झाली असून त्याबद्दल आपणांस हिशोब देतां यावयाचा नाहीं ह्मणून [illegible] संस्थानांतील एका बाकरानें विहिरींत जीव दिला. ठा० अ०

जपानमध्यें एक मुलगी राक्षसीण म्हणण्यासारखी मोठी आहे. तिला हल्लीं बारा वर्षे पांच महिनें झाले आहेत आणि ती आतां ८ फूट उंच आहे व तिचें वजन २७० रतल आहे असें ह्मणतात.

ब्रम्ह देशांतील स्वारीबद्दल कांहीं सरदार मंडळींस बक्षिसें दिलीं जात आहेत. त्यांत सर फ्रेडरिक राबर्टस यांस १९,००० रु०; सर चार्लस अर्बथनाट व जनरल म्याकफर्सन या प्रत्येकास ९,७५६ रु० प्रमाणें व जनरल व्हैट यांस १,६८८ रु० द्यावयाचें ठरलें आहे.

बंगाल इलाख्यांत कांहीं ठिकाणीं लुटारू लोक दंगे करावयास लागले आहेत. सागंजकडून असें वर्तमान कळतें कीं पांच बंगाली शतकरी शेजारच्या गांवीं जनावरें विकत घ्यावयास जात असतां वाटेत लुटारू लोकांनीं त्यांजवर हल्ला केला त्यांजमुळें तीन असामी ठार मारले गेले व दोघे इतके जखमी झाले आहेत कीं त्यांची वाचण्याची आशा नाहींशी झाली आहे. कांहीं शिपाई त्यांच्या मदतीस गेले होते त्यांसही बरीच इजा झाली आहे.

हैदराबादेचे रेसिडेंट कार्डेरा साहेब शिमल्यास गेले आहेत. निजाम साहेबांनीं पैशाची [illegible] देण्याचें कबूल केलें आहे त्याचो [illegible]करितां व फौजेचा कां[illegible] [illegible]लेले अगावित आगा

लोकांचा तर्क आहे.

मध्य प्रांतांतील सगर येथील दोनशें लोकांनीं सभा करून डेप्युटी कमिशनराविरूद्ध अर्ज केला. चीफ कमिशनर यांच्या हुकमावरून या २०० असामीस कैद केलें आहे व त्यांची चवकशी होण्याकरितां त्यांस जबलपुरास पाठविणार असें सेंट्रल इंडियान्यूजवरून कळतें.

यूनैटेड किंगडम म्हणजे इंग्लंड, स्काटलंड व ऐरलंड मिळून १२,९१,१०,००० रु० तंबाखू ओढण्यांत खर्च होतात असें समजतें.

बंगाल इलाख्यांत एकंदर २३१ धर्मार्थ दवाखानें आहेत व त्या निमित्त अडीच लक्ष रु० वर्षाचे खर्च होतात.

प्रसिद्ध जनरल वालेनटैन बेकरपाशा हे ज्वरानें टेबेल कबीर येथें वारल्याचें दुःखकारक वर्तमान आलें आहे.

अलहाबाद येथील ग्रेट ईस्टर्न होटेल रामपूरचे राजे रामपाळ सिंग यांणीं तीस हजार रुपयांस विकत घेतलें.

म्यूर कालेजचे प्रिन्सिपाल मि. ए. गफ यांस अलहाबाद युनिव्हर्सिटीचे रेजिस्ट्रार नेमिलें.

दारू पिण्याचें प्रकरण पृथ्वीवर किती माजत चाललें आहे हें पुढच्या गोष्टी वरून सहज लक्षांत येईल. बाटल्यांचीं बुचें काढण्याचे स्क्रू न्यूयार्क येथील एक्या कारखान्यांत वर्षास पंधरा कोटी तयार होतात असें समजतें.

चीन पोर्तुगल या सरकारांमध्यें तंटा उत्पन्न झाला आहे. चीनचें सरकार कराराप्रमाणें वागत नाहीं असें समजतें.

सरकारानें जामीनगत पतकरलेल्या रेलवेची स्थिति सन १८८६ सालीं समाधान मानण्यासारखी होती असें समजतें. सन १८८२ सालीं २८,३२,०२५ रु० चें नुकसानें होतें. सन १८८६ सालीं १५,९१,०७७ रु० नफा झाला असें कळतें.

श्रीमंत तात्यासाहेब सांगलीकर यांस आपल्या संस्थानचा पुर्णाधिकार मिळण्याच्या समारंभाच्या प्रसंगी मानपत्र देण्याचा पुण्याच्या सार्वजनिक सभेनें ठराव केला. मु० प०

शिल्पविद्येच्या कामांत यूरोप व अमेरिका ह्यांची दिवसें दिवस उन्नतीच होत आहे. मि. यान् ह्या नांवाच्या गृहस्थानें बाफेचें विमान तयार करण्याची खटपट चालविली आहे. ह्या यानाचा आकार त्यानें मत्स्यासारखा बनविला आहे ह्याची लांबी दोनशें फूट आहे. ह्या विमानांत ग्यासची योजना असून हें चालवितां यावें ह्मणून त्यांत इनूजन यावयाचें आहे. स्वच्छ हवा असल्यास ह्या यानाची गति दर सेंकदास १३ किंवा १४ मैल राहील असें विमानकर्त्याचें अनुमान आहे. रामायणांत पुष्पक विमानाचें वर्णन ऐकून आमच्या लोकांस ही केवळ दंतकथा आहे असें वाटत होतें; परंतु सांप्रत आकाशयाना विषयीं यूरोप व अमेरिका येथील शिल्पशास्त्रज्ञ विद्वानांचें अव्याहत चाललेले प्रयत्न, व त्यांत त्यांस थोडी बहुत मिळालेली सिद्धी, ह्याविषयीं विचार केला असता प्राचीन कालीं आमच्या आर्यलोकांस शिल्पशास्त्राचें ज्ञान अवश्य असलेंच पाहिजे असें स्पष्ट अनुमान होतें. पदार्थविज्ञानशास्त्राचो, व शिल्पशास्त्रा

ची अभिरुचि आमच्या लोकांस केव्हां लागेल ती लागो!

हिंदुस्थानांतील एतद्देशीय राजेरजवाडे हे हिंदुस्थानांतील इंग्लिश राजाचे आधार भुतस्तंभ होत. इ. स. १८५७।५८ सालचा बंडावा ह्या ह्मणण्याची सत्यता दाखविण्यास बस्स आहे. हिंदुस्थानात इंग्रजांचें राज्य चिरस्थाईक होण्यास नेटिव्ह संस्थानें हीं कारणीभूत होत असें ह्मणणें खरोखर चुकीचें होणार नाहीं. कांहीं दिवसापूर्वीं असा एक बूट निघाला होता कीं एक कमिशन बसवून हिंदुस्थानसरकारचीं कृत्यें तपासावीं; आणि ह्या प्रमाणें कमिशन बसून चौकशी झाली असती तर हिंदुस्थान सरकार आणि नेटिव्ह संस्थानें ह्यांच्यामधील परस्परांचा संबंध ह्या गोष्टीची चौकशी पहिल्यानें सुरू झाली असती; व त्यांतून इतकें निघालें असतें कीं एतद्देशीय संस्थानिकाबरोबर प्रत्येक संस्थानांत असलेले पोलिटिकलएजंट आपापलीं कामें संस्थानिकाच्या संबंधानें कोणत्या तऱ्हेनें बजावीत आहेत हें जगासमोर येऊन तत्संबंधीं ने लोकांचे मनावर ग्रह झाले आहेत ते नाहींसे होऊन हिंदुस्थान सरकारचीं येथील कामें जगासमोर आलीं असतीं.

नवांची लागवड–विलायतेंत नवांचाखप दिवसेंदिवस अतिशयित होत असल्यानें मद्रास सरकारानें नवांची लागवड करण्यासाठीं तेथील लोकांस बरेंच उत्तेजन दिलें आहे.

कलकत्ता बंदराचें रक्षण व्हावें ह्मणून ब्रिटन नांवाची टार्पेडोची बोट विलायतेस तयार होत असल्याचें समजतें. ते० मि०

मुंबईस आतां रस्ते साफ करयाचें एक यंत्र करविण्याचा विचार घाटत आहे.

एकदम चौकोनी भोंक पाडतां यावें ह्मणून एकानें चौदा वर्षें प्रयत्न चालविला होता, व तो क्रिया त्याला आतां साध्य झाली आहे.

नुकेंच कलकत्यास औधच्या राजाच्या गाई विकण्यांत आल्या, त्यांत एकेका गाईची किंमत १५०।२००।४५० अशी झाली. कांहीं गाई रोज २० शेर दूध देणाऱ्या होत्या एक बैल ८०० रुपायाचा विकत घेतला होता तो १२० रुपाया विकला गेला!

असें ह्मणतात कीं, मुंबईच्या चेंबर आफ कॉमर्सच्या सुचनेवरून कलकत्याची टंकसाळ बंद करून मुंबईचीच चालू ठेवण्यांत फायदा होईल कीं नाहीं, हें पाहण्याचें सरकारानें मनावर घेतलें आहे. बहुतकरून कलकत्याची टंकसाळ बंद होईल, परंतु कोणताही निकाल करण्यापूर्वीं सरकारानें अगोदर कलकत्याच्या व्यापाऱ्यांनें मत विचारिलें आहे. पु. वै.

फोटोग्राफ काढण्याचे कामीं एक नवीन शोधः–हल्लीं दिवसा फोटोग्राफ काढण्याची रीती चालू आहे परंतु नवीन शोधानें रात्रीं देखील फोटोग्राफ काढतां यावेत ह्मणून एक रोषनाई तयार केली आहे. या रोषनाईच्या योगानें अंधारी अंधारी रात्र असली तरी फोटोग्राफ उत्तम प्रकारें निघतो. रोषनाई तयार करण्यांत म्यागनेशीया नांवाची धातु, क्लोरेट आफ पोट्याश आणि सलफाईट आफ अंटीमनी (सुरमा व गंधकाची बनावट) हीं आहेत.

कोलटारपासून सर्वांत गोड साखर उत्पन्न होते. ही साखर उसाचे साखरेपेक्षां ३००शें हिश्यानें गोड असते ही साखर औषधांत कारच उपयो[गी] औषधांत [illegible] व नाहीं. [illegible] जर चहाचे [illegible] होतो. परंतु [illegible] साखरे प्रमाणें [illegible] आलें आहे.

विषमज्वराव[illegible]च्या रसांत मिरपूड [illegible]ून द्यावी.

कोणी कामदार वारले आणि त्यांची बाकी त्यांच्या वारसाना द्यावयाची असेल तर दोनशें रुपयापर्यंत देण्याचा कलेक्टराला अधिकार होता, तो आतां १०० रुपयेपर्यंत सरकारांनें वाढविला आहे.

सुमात्रा बेटाच्या किनाऱ्यावरील कांहीं भागाच्या खलाशांनीं आवाजावरून समुद्राचे तळीं काय आहे व समुद्राचे पाणी खोल किती हें समजण्याची युक्ति काढली आहे. आपल्या हातांतील वोल्ह्याचे एक टोंक ते समुद्रांत बुडवितात आणि दुसऱ्या टोंकाशीं कान लावितात व अशा रीतीनें ही माहिती ते मिळवितात.

ज्ञानसागरचा चांदोरीचा एक बातमीदार लिहितो कीं, एका सुताराची बायको कोणा लोहाराशीं लागू झालेली तिच्या नवऱ्यास कळतांच त्यानें लोहाराच्या बायकोला भर रस्त्यांत धरून मंडळी समक्ष आपली पापवासना तृप्त करून घेतली!!

रेलवे–कास्पियन समुद्र आणि पासिफिक महासागर हा रेलवे जोडून टाकण्या विषयीं झार साहेबांनीं मंजुरी दिली. सदर्हू रेलवे १८९१ मध्यें सुरू होईल.

दुर्दैव–टर्कीच्या सुलतान साहेबांनीं सर सालरजंग यास एक किताब देण्याचें योजिलें होतें. परंतु इंग्रज सरकाराकडून सदर मान स्वीकारण्याची त्यांस दुर्दैवानें परवानगी मिळाली नाहीं. नमस्कार असो या राजकारस्थानाला॥ न्या. सिं.

नवाशोध–शेंदेलोणापासून कार्बोनेट आफ पोट्याश हा उपयुक्त क्षार काढण्याची युक्ति लेफटेनंट एफ. बी. पामसन याणीं काढली तिचा सरकारांत विचार चालू आहे.

ऊबराखण्याचा उपाय–अमेरिकन लोकांसारखे कल्पक थोडेच. आंगांत ऊब राखण्या साठीं एकानें अशी युक्ति काढली आहे कीं, वरून खालून कापड आणि मध्य कापीव लांकडाचें भूस घालून आंगरखा तयार केला असतां नामी ऊब रहाते. थंडीस आंत शिरूं न देण्याचा लांकडाच्या आंगीं धर्म आहे. त्यामुळें थंडीस आंत शिरवत नाहीं ही युक्ति गरीबांच्या फार उपयोगी आहे.

पाखरांचें अद्भुत प्रेम–एका गृहस्थानें बदकाच्या नर मादीचा एक जोडा बाळगिला होता. पुष्कळ दिवसांनीं नरास जरा प्राप्त होऊन तो मरण पावला. त्याची मादी नरा साठीं इतकी कष्टी झाली कीं, सारा दिवसभर ती अगदीं भांबवल्या सारखी होती. दुसरे दिवशीं नरास जेथें पुरलें होतें त्या जागीं जाऊन या मादीनें प्राण सोडला. काडी मोडून वेऊन दुसरा नवरा, दुसरी बायको करणारांस हें प्रेम पाहून खरोखर लज्जा वाटावी. श. सु.

☞ हें पत्र आकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

[illegible]ार.

Advert[illegible]
Below 1[illegible]
Per line o[illegible]
Repetition[illegible]

७ इ० अं[illegible]

[illegible]t the District. Sadmal Tansookds.